
RNI : MAHMAR/2022/88796
www.vidarbhkesari.com Vidabh Kesari News 90969 45629 @vidarbhkesari
vidarbhkesari21@gmail.com

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com

अमरावती
१९ गुरुवार फेब्रुवारी २०२६
✻ वर्ष ५ ✻ अंक २६५
✻ पृष्ठ : ६ ✻ मूल्य रु : ३

सुवर्ण संधी! सुवर्ण संधी!!
धमाका ऑफर
३ दिवस मोफत!
तुमच्या व्यवसायाला हवी आहे का मोठी प्रसिद्धी?
मग 'दैनिक विदर्भ केसरी' देत आहे तुम्हाला एक जबरदस्त प्लॅटफॉर्म!
१ दिवसाच्या जाहिरातीवर ३ दिवस मोफत!
कोणासाठी: दुकानदार, शैक्षणिक संस्था, शोरूम्स आणि सर्व व्यावसायिकांसाठी.
घाई करा! ही संधी सोडू नका.
अधिक माहितीसाठी संपर्क करा:
9975532291/9096945629

### आज शिवजयंती



१९ फेब्रुवारी २०२६ रोजी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती महाराष्ट्रभरात अत्यंत उत्साहात साजरी केली जात आहे. शिवनेरीवर जन्मलेल्या या जाणत्या राजाच्या शौर्य आणि पराक्रमाचे स्मरण करून, राज्यात विविध ठिकाणी मिरवणुका, पोवाडे आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात.

# टेन्शन घेऊ नका! शांत डोक्याने पेपर सोडवा

## राज्यात १६ लाख १५ हजार विद्यार्थी शुक्रवारपासून देणार दहावीची परीक्षा

**▸विदर्भ केसरी। पुणे:**



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणारी इयत्ता दहावीची परीक्षा शुक्रवार (दि. २०) पासून सुरू होत आहे. या परीक्षेसाठी राज्यभरातून एकूण १६ लाख १५ हजार ४८९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

त्यापैकी ८ लाख ६५ हजार ७४० मुलगे, ७ लाख ४९ हजार ७३६ मुली आणि १३ ट्रान्सजेंडर आहेत. एकूण ५ हजार १११ मुख्य केंद्रांवर ही परीक्षा होणार आहे. राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे प्रभारी अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडशे यांनी ही माहिती दिली.

पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत ही परीक्षा होत आहे. या परीक्षेसाठी एकूण २३,६८३ शाळांमधून या विद्यार्थ्यांची नोंदणी झाली आहे. १८ मार्च रोजी शेवट होणार आहे. दरम्यान, बारावी परीक्षेत घडलेल्या कॉपी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर बैठे पथक वाढवण्यावर भर दिला आहे. दहावी बोर्डाच्या एकूण ५,१११पैकी १९१ केंद्र संवेदनशील आहेत. ही बाब विचारात घेऊन प्रशासनाकडून जिल्हा दक्षता समिती मार्फत आवश्यक खबरदारी घेण्यात येत आहे. परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित असावी, असा आमचा प्रयत्न होता. पण, ५५४ केंद्रांवर सीसीटीव्ही यंत्रणा उपलब्ध होऊ शकली नाही, असेही डॉ. बेडशे यांनी स्पष्ट केले.

इयत्ता बारावी प्रमाणेच दहावी बोर्ड परीक्षेला सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षेचा ताण येऊ नये. राज्यात सर्वत्र तणावमुक्त आणि कॉपीमुक्त परीक्षा पार पडावी म्हणून राज्य मंडळाने विशेष खबरदारी घेतली आहे. विद्यार्थ्यांनो, परीक्षेचा ताण आल्यास चिंता करत न बसता फोन करा आणि शंकांचे निरसण करून तणावमुक्त व्हा, असे आवाहन राज्य शिक्षण मंडळाने केले आहे. यासाठी समुपदेशकांची नियुक्ती करून संपर्क क्रमांक देखील उपलब्ध करून दिला आहे. विद्यार्थ्यांनी ९९६०६४४४११, ७९७२५७३७४२, ९८३४०८४५९३, ९३५९९७८३१५, ८१६९२०२२१४, ९३७९६६१२५५, ७२०८४२९३८१, ७७०९१५६०६८, ८४२११५०५२८, ९४०४७८३९९६ या क्रमांकांवर संपर्क साधून आपल्या शंकांचे निरसण कराव, असे आवाहन करून अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडशे यांनी सर्व विद्यार्थ्यांना तणावमुक्त परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

- **राज्य मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात येणारी दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान आयोजित केली आहे. या परीक्षेनिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत बेडसे यांनी ही माहिती दिली. या परीक्षेसाठी आठ लाख ६५ हजार ७४० विद्यार्थी, सात लाख ४९ हजार ७३६ विद्यार्थिनी आणि १५ तृतीयपंथी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. राज्यातील एकूण २३ हजार ६८३ शाळांमधून विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून संपूर्ण राज्यातील पाच हजार १११ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा होणार आहे.**

## २१० कोटींच्या इन्शुरन्ससाठी विमान पाडले?

**▸विदर्भ केसरी।बारामती**

अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पुन्हा एकदा गंभीर शंका उपस्थित करत हा अपघात नसून घातपात असू शकतो, असा दावा केला आहे. नुकत्याच घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी काही नवीन आणि गंभीर माहितीच्या आधारे तांत्रिक मुद्यांचा उल्लेख करत घातपाताचा संशय दृढ झाल्याचे सांगितले आहे.

रोहित पवार म्हणाले की, २७ तारखेला घडलेल्या काही घटनांमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्या दिवशी काही व्यक्तींची भेट, आलेले फोन कॉल्स आणि त्यानंतर घडलेली घटना यामध्ये संबंध असू शकतो का?, याचा तपास होणे गरजेचे आहे. रोहित पवारांच्या मते समोर येत असलेली माहिती पाहता हा केवळ अपघात नसून नियोजनबद्ध कारवाई असण्याची शक्यता नाकारता येत नाही. विमानाच्या खरेदीविषयी बोलताना त्यांनी सांगितले की, हे विमान मूळ ३५ कोटी रुपयांना खरेदी करण्यात आले होते. मात्र त्याची सध्याची स्थिती आणि इंजिनची गुणवत्ता पाहता आज त्याची बाजारातील किंमत जास्तीत जास्त १० ते १५ कोटी रुपये असू शकते. काही तज्ज्ञांच्या मते आणि ज्यांनी हे विमान पूर्वी चालवले, त्यांच्या मते तर १० कोटींनाही ते घेणे योग्य ठरले नसते, असे त्यांनी नमूद केले. रोहित पवारांनी इन्शुरन्स संदर्भात मोठा मुद्दा उपस्थित केला आहे. विमानाची इन्शुरन्स व्हॅल्यू सुमारे ५५ कोटी रुपये होती. मात्र 'लायबिलिटी इन्शुरन्स' तब्बल २१० कोटी रुपये असल्याचे त्यांनी सांगितले. या रकमेचा समावेश विमानात बसलेले लोक, विमान एखाद्या घरावर किंवा प्राण्यांवर पडले तर होणारे नुकसान, या सर्वांचा समावेश होतो. याशिवाय २१० कोटी रुपयांच्या एकूण विमा रकमेपैकी मुख्य पायलटला किती रक्कम मिळाली असती, ही माहिती त्यांना होती का, आणि प्रत्यक्षात ही रक्कम मिळणार होती का, २१० कोटींच्या इन्शुरन्ससाठी अजित दादांचे विमान पाडले का? याबाबत स्पष्टता आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले.

# एसटी बस-ऑटोच्या धडकेत ५ ठार

## अमरावतीतील वरुड-राजुरा रोडवर भीषण अपघात

**▸विदर्भ केसरी। अमरावती**





अमरावतीत भीषण अपघात झाला आहे. एसटी बस आणि ऑटोच्या धडकेत शाळकरी मुलांसह अन्य चौघांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. तर इतर तीन प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत, जखमींना उपचारासाठी नागपूर येथे हलवले आहे. सदर घटना सकाळच्या सुमारास जिल्ह्यातील वरुड-राजुरा बाजार रोडवर घडली आहे. या भीषण अपघातानंतर परिसरात खळबळ उडाली असून पोलिस या प्रकरणी अधिक तपास करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, अमरावती जिल्ह्यातील वरुड तालुक्यातील ग्रामीण भागातील शाळेतील मुलं हे वरुडला रिक्षाने जात होते. या रिक्षामध्ये काही स्थानिक नागरिक देखील होते. दरम्यान वरुड-राजुरा बाजार रोडवर प्रवाशांनी भरलेली एसटी बस आणि ऑटो यांची धडक झाली. ही धडक इतकी भीषण होती की रिक्षाचा चक्काचूर झाला. आणि रिक्षातील ५ जणांचा जागीच मृत्यू झाला. या मृतांमध्ये शाळकरी मुलांचा देखील समावेश आहे. तर तीन प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत, जखमींना उपचारासाठी नागपूर येथे हलवले आहे.

या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. अपघाताच्या आवाजाने स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली पोलिस अधिक तपास करत आहेत.

# रुग्णालयात तणावाचे वातावरण

**▸विदर्भ केसरी। वरुड,**



शिवाई बस व ऑटोरिक्षा अपघातानंतर ग्रामीण रुग्णालयात तणावाचे वातावरण दिसून आले. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने भाडेतत्त्वावर चालविल्या जातात. या अपघातात मृत झालेल्यांच्या नातेवाईकांना २० लाखाची सानुग्रह मदत परिवहन विभागाकडून देण्यात यावी अशी मागणी विभागीय नियंत्रक निलेश बेलसरे यांच्या उपस्थितीत सामाजिक कार्यकर्त्यांसह मृतकाच्या नातेवाईकांकडून करण्यात आली आहे.

अपघातानंतर घटना स्थळावरची परिस्थिती पाहील्यावर अपघातास प्रथमदर्शनी बस चालक जबाबदार असल्याचे दिसत आहे. प्रत्यदर्शींचे तेच म्हणने आहे. Warud Hospital सामान्य नागरिकांमध्ये अपघातानंतर प्रचंड संतापाची भावना होती. रुग्णालयात खूप गर्दी जमल्याने तणावाची स्थिती निर्माण झाली होती. पोलिसांनी तणाव कमी करण्याचा प्रयत्न केला. नातेवाईकांचा आक्रोश मन हेलावणारा होता. या घटनेने परिसरात शोककळा पसरली होती. पोलिसात बसचालकाविरूद्ध तक्रार होताचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बस ताब्यात घेण्यात आली असून चालकाला अटक करण्यात आली.

रा. प.च्या नियमानुसार त्रयस्त वाहनातील व्यक्ती मृत पावल्याने तत्काळ मदत देता येत नाही. परंतु, अपघाताचे गांभीर्य व सविस्तर घटना बघता मृत कुटुंबीयांच्या वारसास नियमाप्रमाणे व न्यायालयाच्या आदेशानुसार त्वरित सर्वतोपरी मदत व सहकार्य करण्यात येईल असे आश्वासन एस. टी महामंडळ विभाग नियंत्रक निलेश बेलसरे यांनी दिले. अपघात मृत झालेल्यांच्या अंत्यविधीसाठी प्रशासनाच्या वतीने प्रती व्यक्ती १० हजाराची आर्थिक मदत नातेवाईकांकडे सोपविण्यात आली आहे.

# 'अब तक सतरा'; टीम इंडिया सगळ्यांसाठीच खतरा!

**▸विदर्भ केसरी।**


शिवम दुबेच्या स्फोटक खेळीनंतर गोलंदाजीत वरुण चक्रवर्तीच्या फिरकीच्या जादूच्या जोरावर टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेतील साखळी फेरीतील अखेरच्या सामन्यातही भारतीय संघाने बाजी मारली.

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर रंगलेल्या भारतीय संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना १९३ धावा करत नेदरलँड्सच्या संघासमोर १९४ धावांचे टार्गेट सेट केले होते. या धावसंख्येचा पाठलाग करताना नेदरलँड्सचा संघ निर्धारित २० षटकात ७ विकेट्सच्या मोबदल्यात १७६ धावांपर्यंतच मजल मारू शकला. हा १७ धावांनी जिंकत टीम इंडियाने आयसीसी स्पर्धेतील सलग १७ व्या विजयाची नोंद करत आपला वर्ल्ड रेकॉर्ड आणखी भक्कम केला आहे. ICC स्पर्धेतील सलग १७ विजयात टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेतील सलग १२ विजयासह आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेतील सलग पाच विजयांचा समावेश आहे.

भारतीय संघाने दिलेल्या धावसंख्येचा पाठलाग करताना नेदरलँड्सच्या सलामीवीरांनी संघाला चांगली सुरुवात करून दिली. पण धावफलकावर ३५ धावा लागल्या असताना वरुण चक्रवर्तीनं ही जोडी फोडत संघाला पहिले यश मिळवून दिले. एवढ्यावरच तो थांबला नाही तर १३ व्या षटकात वरुण चक्रवर्ती २ चेंडूत २ विकेट्स घेत यंदाच्या टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेत दुसऱ्यांदा हॅटट्रिकच्या उंबरठ्यावर पोहचला होता. पुन्हा एकदा त्याची हॅटट्रिकची संधी हुकली, पण त्याने ३ षटकात फक्त १४ धावा करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. याशिवाय फलंदाजीत धमाका करणाऱ्या शिवम दुबेनं ३ षटकात ३५ धावा खर्च करत २ विकेट्स आपल्या खात्यात जमा केल्या. जसप्रीत बुमराह आणि हार्दिक पांड्या यांनी प्रत्येकी १-१ विकेट घेतली.

# 5 वाहनांना उडवून डंपर जळून खाक

**▸विदर्भ केसरी।**





पुणे-सातारा महामार्गावरील कात्रज येथील जांभुळवाडी बोगद्याजवळ आज एका भरधाव डंपरने 4 ते 5 वाहनांना पाठीमागून जोरदार धडक दिल्याने काळजाचा ठोका चुकवणारा भीषण अपघात झाला असून, या धडकेनंतर डंपरने अचानक पेट घेतल्यामुळे तो पूर्णपणे जळून खाक झाला आहे. या थरारक घटनेत 4 ते 5 प्रवासी गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुणे-सातारा महामार्गावरील जांभुळवाडी बोगद्याजवळ डंपर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने भीषण अपघात झाला असून, या अनियंत्रित डंपरने समोरील चार ते पाच वाहनांना अक्षरशः उडवल्याने मोठी खळबळ उडाली. या धडकेचा वेग इतका प्रचंड होता की अपघातानंतर अवघ्या काही क्षणातच डंपरने पेट घेतला, ज्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य आणि वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. या अपघातात वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, त्यातील 4 ते 5 प्रवासी जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात हलवले आहे. जांभूळवाडी बोगदा, नवले ब्रिज आणि वडगाव ब्रिज हा पट्टा आता अपघातांचे भीषण केंद्र बनला असून, प्रशासनाच्या उदासीनतेमुळे प्रवाशांमध्ये संतापाची लाट आहे. काही दिवसांपूर्वीच नवले ब्रिजवर झालेल्या कंटेनर-कारच्या भीषण धडकेत 7 जणांचा बळी गेल्याची घटना ताजी असतानाही, रोजच्या वाढत्या अपघातांवर आळा घालण्यासाठी कोणतीही ठोस पावले उचलली जात नसल्याचे चित्र आहे. आज झालेल्या अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली असून, पोलिस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# जिवंत लाडक्या बहिणीला दाखवले मृत !

## सरकारी कागदोपत्री चुकांचा फटका बसतोय लाडक्या बहिणींना ?

**▸विदर्भ केसरी। चिमूर :**




राज्य शासनाच्या लाडकी बहीण योजनेतून गरजू महिलांना आर्थिक आधार देण्याचा उद्देश असताना, चिमूर तालुक्यातील एका महिलेला प्रशासनिक चुकीचा फटका बसला आहे. रेखा महेंद्र बारसागडे (३५, रा. किटाडी तुकूम, ता. चिमूर) या महिलेला शासकीय नोंदीत मृत दाखविणे तिचे हक्काचे अनुदान थांबविण्यात आले. या धक्कादायक प्रकारामुळे कुटुंबाला मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

लाडकी बहीण योजना सुरू झाल्यापासून रेखा बारसागडे यांच्या बँक खात्यात नियमितपणे अनुदान जमा होत होते. मात्र, ऑक्टोबर २०२५ पासून अचानक अनुदान जमा होणे थांबले. सुरुवातीला केवायसीअभावी अडचण असावी, असा अंदाज घेत लाभार्थी महिलेने ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली. तरीही अनुदान जमा न झाल्याने बँक व महिला-बालकल्याण कार्यालयात चौकशी केली.

समोर आलेल्या वास्तवाने तिला जोरदार धक्का बसला. महिला व बालकल्याण विभागाच्या लाडकी बहीण पोर्टलवर रेखा महेंद्र बरसागडे यांची मृत अशी नोंद आहे. प्रत्यक्षात ही महिला हयात असून कुटुंबासह जीवन जगत आहे. मात्र, केवळ एका चुकीच्या नोंदीमुळे योजनेचा लाभ थांबविण्यात आला आहे. संबंधित प्रशासन याबाबत काय निर्णय घेते, याकडे कुटूंबाचे लक्ष लागले आहे.

- **कुटुंबीयांना मनस्ताप**

जिवंत लाभार्थीला मृत घोषित करण्याइतकी गंभीर चूक नेमकी कुणाच्या निष्काळजीपणामुळे झाली, याबाबत प्रशासनाकडे कोणतेही ठोस उत्तर नाही. डेटा नोंदणी, पडताळणी आणि अंतिम मंजुरीच्या प्रक्रियेत संबंधित अधिकाऱ्यांनी तपासणी केली होती का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या प्रकरणाची चौकशी करून कारवाई करावी, लाडकी बहीण योजनेचा लाभ तात्काळ पूर्ववत सुरू करावा, अशी मागणी लाभार्थी रेखा बरसागडे यांनी केली आहे.

- **"मी जिवंत आहे. पण, सरकारी कागदपत्रांमध्ये मला मृत केले. लाडकी बहीण योजनेचा लाभ बंद झाला आहे. याला जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करा"**
- **- रेखा महेंद्र बारसागडे, किटाडी (तुकूम) ता. चिमूर**

# राजकारण बाजूला ठेवून मुलीला ताब्यात घेण्यासाठी एकत्र या

**▸विदर्भ केसरी।भिगवण :**



मुलीला नराधमांच्या तावडीतून पोलिसांनी तात्काळ हजर करून कुटुंबियांच्या ताब्यात द्यावी हिंदू धर्मातील धर्माच्या मुलींचे संरक्षण झालेच पाहिजे मुलगी ताब्यात आलीच पाहिजे. सगळ्यांनी राजकारण बाजूला ठेवून मुलगी ताब्यात घेण्यासाठी एकत्र आले पाहिजे. असे आवाहन आमदार गोपीचंद पडळकर यांनी भिगवण येथे केले.

भिगवण येथील तरुणीच्या अपहरणानंतर आरोपीला पोलिसांकडून अटक केली जात नसल्याने संतप्त ग्रामस्थांनी भिगवण येथे भाजपा नेते गोपीचंद पडळकर आणि आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली हिंदू जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. हिंदू जन आक्रोश मोर्चाची सुरुवात भिगवण बसस्थानक ते भिगवण पोलिस स्टेशन पर्यंत मोर्चा काढून नंतर बसस्थानक परिसरात निषेध व्यक्त करत सभा पार पडली. या मोर्चा मध्ये हजारोंच्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, कोणत्याही व्यक्ती हितासाठी ही लढाई नसून अश्या घटना पुन्हा घडू नये यासाठी आपण सतर्क राहिले पाहिजे. या प्रकरणात कोणी दबाव टाकतील कोणतेही व्हिडीओ येतील त्यावर नागरिकांनी विश्वास ठेवू नये असे आवाहन केले.

दैनिक
विदर्भाचा मानबिंदू
# विदर्भ केसरी
गुरुवार, १९ फेब्रुवारी २०२६ | २

## अग्रलेख

# 'ते' वक्तव्य!

इतिहासातील टिपू सुलतान वीर योद्धे होते की नाही यावर मत-मतांतरे असू शकतात; परंतु वर्तमानात थोड्या-थोडक्या कारणावरून, वक्तव्यावरून राडा करण्यास टपलेले अनेक राजकीय वीर योद्धे आहेत यात शंका नाही. मालेगाव महापालिकेच्या नवनिर्वाचित उपमहापौर शान-ए-हिंद यांच्या दालनात टिपू सुलतान यांचे छायाचित्र लावल्यावरून उद्भवलेल्या वादावर पडदा पडला होता. प्रशासकीय नियमांचे उल्लंघन आणि हिंदुत्ववादी संघटनांच्या तीव्र विरोधामुळे महापालिकेच्या नगर सचिव विभागाने हस्तक्षेप करत हे छायाचित्र दालनातून काढून टाकले होते. उपमहापौरांच्या कार्यालयीन कक्षात लावलेल्या टिपू सुलतानच्या प्रतिमेबद्दल विचारले असता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांच्या नंतर टिपू सुलतान यांनी इंग्रजांच्या विरोधात लढा पुकारला होता. टिपू सुलतान एक शौर्य गाजवणारे योद्धे, भूमिपुत्र होऊन गेले. त्यांनी विखारी, विषारी विचार जवळ केले नाही त्यामुळे शौर्याचे लक्षण म्हणून त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या 'समकक्ष' बघायला पाहिजे. सपकाळांच्या या वक्तव्यानंतर वाद पेटला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सपकाळांवर खरपूस टीका करताना म्हटले की, टिपू सुलतानची तुलना छत्रपती शिवाजी महाराजांशी करणे हे अतिशय निंदनीय आहे. हे शुद्ध लांगुलचालन आहे, मतांसाठी जोडे चाटण्याचा प्रकार आहे. सपकाळांनी माफी मागितली पाहिजे. मुख्यमंत्री पुढे म्हणाले, हजारो हिंदूंची हत्या करणारा टिपू सुलतान याची शिवरायांशी तुलना करून दोघांनाही सारखा सन्मान द्या म्हणणे यापेक्षा जास्त लांगुलचालन आणि जोडे चाटणे मी आतापर्यंत बघितले नाही. अशी वक्तव्ये खपवून घेतली जाणार नाहीत. मुख्यमंत्र्यांच्या या इशा-यानंतर भाजपचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरले आणि त्यांनी राज्यभर हर्षवर्धन सपकाळ यांच्या विरोधात जोरदार आंदोलन केले. पुण्यातील काँग्रेसच्या कार्यालयावर दगडफेक झाली. म्हैसूरचा माजी शासक टिपू सुलतान याच्या बाबत सातत्याने वाद सुरू असतो. काँग्रेस आणि अन्य काही पक्षांच्या मते टिपू सुलतान हे ब्रिटिशांविरोधात लढले. यामुळे त्यांचा सन्मान झाला पाहिजे तर भाजपची ठाम भूमिका आहे की, टिपू सुलतान यांनी धर्मांतरे केली, हिंदूंची देवळे पाडली त्यामुळे त्यांचा कोणताही आदर सन्मान केला जाऊ नये. या विरोधी भूमिकांमुळे सतत वाद आणि आंदोलने होत असतात. २०१६ मध्ये कर्नाटकातील काँग्रेस सरकारने टिपू सुलतान यांची जयंती साजरी करण्याचा शासकीय निर्णय घेतला. त्या वेळी भाजपने शासकीय निर्णयाच्या विरोधात मोठे आंदोलन उभारले होते. २०२१ मध्ये भाजपाचे सिद्धरामय्या सरकार सत्तेवर आल्यानंतर ही जयंती साजरी करण्याचा शासकीय आदेश रद्द करण्यात आला. २०२१ मध्ये उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना मिरा भाइंदरचे शिवसेनेचे नेते सलमान हाशमी यांनी टिपू सुलतान जयंतीचे पोस्टर जारी केले होते. २०२३ मध्ये फरार उद्योगपती विजय माल्ल्या यांनी काही कोटी रुपये देऊन टिपू सुलतान यांची तलवार लिलावात विकत घेतली होती. ती भारतात आणण्याची घोषणा केली तेव्हाही असाच वाद निर्माण झाला होता. त्या वेळी भाजपा रस्त्यावर उतरली होती. आता महाराष्ट्रात पुन्हा हा वाद उफाळून आला आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांना समान महत्त्व असल्याचे म्हटल्याचा आरोप करत भाजपने राज्यभर आंदोलन केले. ठिकठिकाणी सपकाळ यांच्या बॅनरला काळे फासले. पुण्यात काँग्रेस कार्यालयावर दगडफेक केली आणि सपकाळ यांनी माफी मागावी, अशी मागणी केली. सपकाळ यांच्या वक्तव्याविरोधात भाजपने मुंबई, पुणे, नाशिक, संभाजीनगर, नागपूर, सोलापूर, नांदेड, सांगली, अहिल्यानगर या ठिकाणी आंदोलने केली. मराठा ठोक मोर्चा संघटनेचे समन्वयक महेश डोंगरे यांनी सपकाळ यांच्या तोंडाला काळे फासणा-याला लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले तर सपकाळ यांनी एपस्टिन फाईलमधील माहिती बाहेर येऊ नये म्हणून जनतेचे लक्ष विचलित करण्याचा भाजप प्रयत्न करत असल्याचा आरोप करत पलटवार केला. भाजपचे रामनाथ कोविंद देशाचे राष्ट्रपती असताना त्यांनी २०१७ मध्ये टिपू सुलतान शूर होते, असे वक्तव्य केले होते. त्याचा भाजपला विसर पडला असून ते आता सपकाळ यांच्या विरोधात रान उठवत आहेत. टिपू सुलतान वक्तव्याप्रकरणी पुण्यात पर्वती पोलिस ठाण्यात सपकाळ यांच्या विरोधात गुन्हा नोंद झाला आहे. पुण्यातील काँग्रेस भवनाबाहेर भाजपच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन करत जोरदार घोषणाबाजी केली. या वेळी काँग्रेसचे कार्यकर्तेही मोठ्या संख्येने जमले होते. सपकाळ यांनी आपली बाजू मांडताना भाजप आपल्या वक्तव्याचा विपर्यास करत आहे, असे म्हटले आहे. भाजप सपकाळ यांच्या विधानाला हिंदू-मुस्लिम रंग देत असल्याचे दिसते. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकांमध्ये भाजपच्या प्रचारात टिपू सुलतान यांचे फोटो होते मग आताच त्याला विरोध का? महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी महाराजांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केले होते ते भाजपला कसे काय चालले? महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे की, मुघलानंतर छत्रपती शिवाजी महाराजांचा इतका मोठा अपमान करणारे सपकाळ हे दुसरे व्यक्ती आहेत. असे असेल तर सावरकरांनी महाराजांबद्दल जे लिखाण केले आहे ते बावनकुळे अथवा भाजपला मान्य आहे काय? भाजपाने राज्यात अमरावती-चंद्रपूरसह २१ ठिकाणी धर्मांध एमआयएमशी युती केली आहे ते कसे काय चालले? सपकाळ यांच्या विरुद्ध भाजपने आक्रमक पवित्रा घेत राज्यभर जी आंदोलने सुरू केली आहेत त्यावर उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी जोरदार प्रहार केला आहे. ते म्हणाले, महाराष्ट्र हा आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचाच आहे आणि कायम राहील, हे सांगण्यासाठी राज्याला भाजपच्या मार्गदर्शनाची अथवा प्रमाणपत्राची मुळीच गरज नाही. ब्रिटिशांविरुद्धच्या ऐतिहासिक लढ्यात भाजप किंवा त्यांच्या विचारसरणीचे लोक कोठेही अस्तित्वात नव्हते त्यामुळे आज त्यांनी शिवरायांच्या नावावर राजकारण करणे हा दांभिकपणा आहे.

# आठवडी बाजारात राडा

**विदर्भ केसरी। सेलू,**

**शहरातील मंगळवारच्या आठवडी बाजारात नगरपंचायत प्रशासन आणि भाजी विक्रेत्यांमध्ये मोठा संघर्ष पाहायला मिळाला. प्रशासनाने कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक रस्ते रिकामे करण्याची मोहीम हाती घेतल्याने संतापलेल्या विक्रेत्यांनी आपला भाजीपाला रस्त्यावर फेकून तीव्र निषेध नोंदवला.**



सेलू येथील आठवडी बाजार मुख्य रस्त्यावर भरत असल्याने होणारी वाहतूक कोंडी आणि अपघातांचे प्रमाण लक्षात घेता मंगळवार १७ रोजी नगर पंचायत प्रशासन ॲक्शन मोडमध्ये येत कारवाई केली. सकाळी १० वाजतापासूनच मुख्याधिकारी, कर्मचारी आणि पोलिस ताफा बाजारात दाखल झाला. रस्त्यावर बसणाऱ्या विक्रेत्यांना बाजार तळावरील मोकळ्या जागेत जाण्याचे आदेश देण्यात आले. विक्रेत्यांच्या मते, गेल्या आठवड्यात नगर पंचायत किंवा संबंधित ठेकेदाराकडून याबाबत कोणतीही दवंडी किंवा पूर्वसूचना देण्यात आली नव्हती. अचानक झालेल्या या बदलामुळे विक्रेत्यांची मोठी तारांबळ उडाली. दिवसभर चाललेल्या या तणावानंतर सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास विक्रेत्यांचा संयम सुटला आणि त्यांनी आपला माल रस्त्यावर फेकून प्रशासनाचा निषेध केला. प्रशासनाने आम्हाला आधी विश्वासात घ्यायला हवे होते. अचानक आम्हाला उठवल्यामुळे आमचे आर्थिक नुकसान झाले आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया भाजी विक्रेत्यांनी व्यत केली.

# कुत्र्यांचा हैदोस; १२ जणांना घेतला चावा



**विदर्भ केसरी। वर्धा,**

आर्वीत पिसाळलेल्या कुत्र्यांनी स्टेशन वार्ड व इतर ठिकाणी धुमाकूळ घालून १२ जणांचे लचके तोडले. यात सहा बालकांचा समावेश आहे. यातील एका बालकाला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा मृत्यू झाल्याने शहरात चांगलीच खळबळ उडाली.

मिळालेल्या माहितीनुसार, येथील मटन मार्केट जवळ कुत्र्यांचे झुंडच्या झुंड असतात. दुपारनंतर गावात फिरतात. त्यापैकी एका पिसाळलेल्या कुत्र्याने चावा लहान मोठ्यांना चावा घेण्याचा सपाटा लावला. यात धवल गजानन गुल्हाणे (८) या बालकाचा मृत्यू झाल्याने ही बाब चव्हाट्यावर आली. या घटनेची दखल घेत नगरपालिका प्रशासनाने श्वानांच्या निर्बीजीकरणाला सुरुवात केली. या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी नगरपालिका प्रशासन जागे झाले आहे. The horror of crushed dogs आ.र सुमित वानखेडे यांनी मुख्याधिकाऱ्यांना निर्देश देताच मुख्याधिकारी डॉ. किरण सुकलवाड, नगराध्यक्ष स्वाती गुल्हाने, उपाध्यक्ष गौरव जाजू, संजय राऊत, शहराध्यक्ष राहुल गोडबोले, आरोग्य सभापती संजय थोरात, आरोग्य निरीक्षक सुनील आरीकर, प्राणिमित्र शुभम जगताप आदींनी पुढाकार घेतला.

# जिल्ह्यातील ७.५९ लाख शेतकऱ्यांवर २३०५ कोटींचे कर्ज

**विदर्भ केसरी। वर्धा,**

विधानसभा निवडणुकीदरम्यान सरकारने शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफीची घोषणा केली होती. त्या अनुशंगाने कर्ज थकबाकीदार शेतकऱ्यांची यादी सरकारने मागविली आहे.

३० डिसेंबर २०२५ पर्यंत जिल्ह्यातील ७ लाख ५९ हजार ८५८ शेतकऱ्यांवर २ हजार ३०५ कोटी ४७ लाख रुपयांचे कर्ज असून ३० जून २०२६ पूर्वी त्यांची कर्जमाफी करता येईल का, यावर सरकार काम करीत असून या निर्णयाकडे आता शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.मागील काही वर्षांपासून शेतकऱ्यांना निसर्गाच्या लहरीपणाचा फटका बसत आहे. कधी ओला तर कधी कोरडा दुष्काळ, त्यातच रोगराईचा प्रादुर्भाव यामुळे शेतकरी पूर्णत: मेटाकुटीस आला आहे. त्यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांवर दिवसेंदिवस कर्जाचा डोंगर उभा ठाकला आहे. बी-बियाणे, खतांचे वाढते दर आता शेतकऱ्यांना परवडणारे राहिले नाही. मजुरांची मजुरीही वाढत असून लावलेला पैसाही शेतकऱ्यांच्या पदरी पडत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना रबी, खरीप आणि विविध कृषी आधारित उद्योगांकरिता बँकांकडून कर्ज उचलावे लागते. बँकांचे कर्ज भरण्यास शेतकरी असमर्थ राहिला आहे. दरम्यान, २०२४ मध्ये विधानसभा निवडणुकीत सरकारने शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची घोषणा केली होती. मागील दोन वर्षांपासून शेतकऱ्यांना निराशाच हाती लागली. यावर्षी खरीपासह रबीही हातून गेला.

# जिल्ह्यात शिवजयंतीची धूम; १६२ ठिकाणी शोभायात्रा

**विदर्भ केसरी। वर्धा,**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जिल्ह्यात १६२ ठिकाणी शोभायात्रा काढण्यात येणार आहे. शिव जयंतीनिमित्त ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांसह शिवाजी महाराजांचे जीवनचरित्र उलगडवणारे पोवाडा तर मिरवणुकीचे आयोजनही करण्यात आले आहे.



जिल्ह्यात वर्धा, सेलू, पुलगाव, देवळी, खरांगणा, आर्वी, तळेगाव श्यामजी पंत, हिंगणघाट, वडनेर, गिरड आदी १३ ठिकाणी शिवाजी महाराजांचे पुतळे आहेत. शिवजयंतीचे औचित्य साधून ९९ ठिकाणी माल्यार्पण करून अभिवादनाचा कार्यक्रम होणार आहे. shiv-jayanti-celebrations जिल्ह्यात १६२ ठिकाणी महाराजांची शोभायात्रा काढण्यात येणार आहे. यात वर्धा ४, सावंगी २, सेवाग्राम ७, सेलू २, सिंदी ३, दहेगाव ४, पुलगाव १७, देवळी १६, अल्लीपूर १४, खरांगणा ११, आर्वी १३, कारंजा घा. ७, आष्टी शहीद ६, तळेगाव श्या.पं. ५, हिंगणघाट १३, वडनेर १८, गिरड १० आणि समुद्रपूर येथे १० ठिकाणी शोभायात्रा काढण्यात येणार आहे. जयंती उत्सव शांततेत पार पाडण्याकरिता पोलिस विभागातर्फे बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यात पोलिस अधीक्षक, अपर पोलिस अधीक्षक, उपविभागीय पोलिस अधिकारी ५, पोलिस निरीक्षक १३, सहायक पोलिस निरीक्षक आणि पोलिस उपनिरीक्षक ७५, पोलिस शिपाई ८५० यासोबत ८३२ गृहरक्षकांचा समावेश आहे.

# ओबीसी व डीएनटी विद्यार्थ्यांसाठी केंद्राची 'पीएम-यसस्वी' योजना

## मॅट्रीकपूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**विदर्भ केसरी। यवतमाळ,**



: केंद्र सरकारच्या पीएम-यसस्वी या एकछत्री योजनेंतर्गत विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास वर्ग प्रवर्गातील अधिवास असलेल्या विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना शासनाने लागू केली आहे. या योजनेचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक ओमप्रकाश नगराळे यांनी केले आहे.

मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना इयत्ता ९ वी व १० वीमध्ये शिक्षण घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांसाठी लागू आहे. या अंतर्गत विद्यार्थ्यास दर शैक्षणिक वर्षाला रुपये ४ हजार इतका शैक्षणिक भत्ता मिळणार आहे.

तसेच मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना ओबीसी, डीएनटी तसेच विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी लागू असून, महाआयटीच्या महाडीबीटी पोर्टलवर मॅपिंग केलेल्या अभ्यासक्रमांसाठी ही शिष्यवृत्ती देण्यात येत आहे. शुल्क निर्धारण समिती एफआरए सक्षम प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कानुसार राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास वर्गातील विद्यार्थ्यांना महा डीबीटी पोर्टलवरील निर्धारित दराप्रमाणे शिष्यवृत्ती शिष्यवृत्ती लागू राहणार आहे.

या योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज संबंधित शाळा व महाविद्यालयांनी तात्काळ पडताळणी करून सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, यवतमाळ कार्यालयात सादर करावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत. एखादा विद्यार्थी लाभापासून वंचित राहिल्यास त्यास सर्वस्वी संबंधित शाळा किंवा महाविद्यालय जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. या शिष्यवृत्ती योजनेचा जास्तीत जास्त पात्र विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक संचालक ओमप्रकाश नगराळे यांनी केले आहे.

# शेंबाळपिंपरीत बनावट देशी मद्यसाठ्यावर छापा

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई : दोन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

**विदर्भ केसरी। पुसद**

पुसद तालुक्यातील शेंबाळपिंपरी येथे राज्य उत्पादन शुल्क विभाग, पुसद-1 विभागाने बनावट देशी मद्य निर्मिती व विक्री प्रकरणी मोठी कारवाई करत सुमारे 2 लाख 2 हजार 40 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई 16 फेब्रुवारी रोजी गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आली.



मिळालेल्या माहितीनुसार, मौजे शेंबाळपिंपरी, ता. पुसद, जि. यवतमाळ येथील एका किरकोळ देशी दारू दुकानात बनावट मद्य तयार करून त्याची विक्री केली जात असल्याची माहिती विभागाला मिळाली होती. त्यानुसार दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पुसद-1 विभाग यांच्या पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला असता मोठ्या प्रमाणात बनावट देशी दारू तसेच त्याच्या निर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य आढळून आले.

कारवाईदरम्यान 90 मि.ली. आणि 180 मि.ली. क्षमतेचे बनावट देशी दारूचे बॉक्स, बनावट लेबल, ओरिजिनल लेबल, बनावट बुच (झाकण), एक मोबाईल फोन आणि इतर साहित्य असा एकूण 2 लाख 2 हजार 40 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

हे बनावट मद्याचे सेवन केल्याने लोकांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो तसेच शासनाच्या महसुलाचे खूप मोठे नुकसान होते. त्यामुळे या प्रकरणी तीन जणांविरुद्ध गुन्ह्या दाखल करून आरोपीना जागीच अटक करुन आरोपीस दोन दिवसांची एक्साईज मिळाली आहे.

ही कार्यवाही आयुक्त राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उप-आयुक्त पराग नवलकर, अधीक्षक नितेश शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली दुय्यम निरीक्षक अनिल पिकले, सुकेशनी शिंदे, जवान पंजाब राठोड, महेंद्र रामटेके, वाघजी बोंबले, पुनम गटलेवार, प्रतिक कौटुरवार यांनी यशस्वीरित्या पार पडली असून पुढील तपास दुय्यम निरीक्षक अनिल एन. पिकले करीत आहेत.

राज्य उत्पादन शुल्क, यवतमाळ यांनी सर्व जनतेस असे आवाहन केले की, अवैध मद्य निर्मिती, विक्री, वाहतूक या बाबत कोणतीही तक्रार असल्यास या विभागाच्या टोल क्रमांक १८००८३३३३३३ व व्हाटसअॅप क्रमांक ८४२२००११३३ या वर संपर्क करावा. माहिती/खबर सांगणाऱ्या व्यक्तीचे नावे गोपनिय ठेवल्या जाईल, असे आवहन करण्यात आले आहे.

# ऐतिहासिक आझाद मैदानात एकवटले कामगार



**विदर्भ केसरी। प्रतिनिधी**

यवतमाळ : येथील रेमंड युको डेनिम प्रा.लि.च्या कामगारांनी गेल्यावर्षी दीर्घ आंदोलन केले होते. आता सोमवारी रात्रीपासून जवळपास दोन हजार कामगार पुन्हा संपावर गेले आहेत. तर बुधवारी (दि. १८) सर्व कामगारांनी शहरातून दुचाकी रॅली काढत आझाद मैदान गाठले. आता आझाद मैदानात हे कामगार बेमुदत धरणे आंदोलन तसेच उपोषणावर बसले आहेत.

सोमवारी रात्रपाळीत कामाला जाण्यासाठी निघालेल्या कर्मचाऱ्यांना लोहारा चौकातच थांबविण्यात आले. अधिकृत कामगार संघ वगळता इतर सर्व संघांनी या संपामध्ये सहभाग घेतला आहे. २०२४ पासूनची वेतनवाढ द्यावी यासह इतरही मागण्यांकरिता हा संप पुकारण्यात आल्याचे कामगारांच्या शिष्टमंडळाकडून सांगण्यात आले. कंपनीने निलंबित केलेल्या सर्व कामगारांना विनाअट कामावर रूजू करून घ्यावे, यापूर्वीच्या संपकाळातील पगार विनाअट देण्यात यावा. वेतन करारात सात हजार २५० रुपये इतकी वेतनवाढ करण्यात यावी. मान्यताप्राप्त संघटनेने मागणीपत्रात नमूद केलेल्या सर्व सुविधा कामगारांना देण्यात याव्या. २०२३-२४ मध्ये दिवाळीचे वाढीव बोनस बंधनकारक असतानाही त्याचा लाभ दिलेला नाही. तसेच नवीन बोनस करार करून त्यामध्ये २० टक्के वाढ करण्यात करावी आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. कंपनीतील भ्रष्ट अधिकाऱ्यांची हकालपट्टी करून प्रशासन भ्रष्टाचारमुक्त करावे असा मुद्दाही मागणीत नमूद केला आहे. या मागण्यांच्या पूर्ततेसाठी बुधवारपासून (दि. १८) आझाद मैदान येथे कामगारांकडून आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

मागण्यांचे निवेदन कामगारांनी मुख्य सचिवांसह कामगार मंत्री, जिल्हाधिकारी, कामगार आयुक्त आणि रेमंड यवतमाळचे कार्य निदेशक यांना दिले आहे. कामगारांचा मागील वेतनवाढीचा करार ३१ मार्च २०२४ ला संपलेला आहे. नवीन करार हा १ एप्रिल २०२४ ला लागू होऊन कामगारांच्या वेतनामध्ये वाढ होणे आवश्यक होते. परंतु कामगारांनी निवडून दिलेली संघटना रेमंड कामगार संघ संघ एनजीपी ५२५२ ही संघटना मान्यता प्राप्त असून कामगारांच्या विरोधात जाऊन पूर्णपणे आर्थिक हीतसंबंध राखून व्यवस्थापनाला सहकार्य करत आहे.

### कामगारांच्या मागण्या

- **- १६ फेब्रुवारी २०२६ रोजी निलंबित केलेल्या सर्व कामगारांना विनाअट कामावर रुजू करून घेण्यात यावे.**
**- संप काळातील १६ फेब्रुवारी २०२६ रोजी तृतीय पाळीपासून कंपनी चालू होईपर्यंत सर्व दिवसांचा पगार कामगारांना विनाअट देण्यात यावा.**
**- वेतन करार १ एप्रिल २०२४ पासून देण्यात येऊन कामगाराच्या वेतन करारात ७२५० रुपयाच्या वर वाढ करण्यात यावी.**
**- मान्यताप्राप्त संघटनेने मागणीपत्रामध्ये मागितलेल्या सर्व सुविधा देण्यात याव्या.**
**- सन २०२३ व २०२४ मध्ये दिवाळीचे वाढीव बोनस देणे बंधनकारक असतानासुद्धा अजूनपर्यंत बोनसचा वाढीव करार करण्यात आलेला नाही. बोनसचा करार करून त्यामध्ये २० टक्के वाढ करण्यात यावी.**
**- कंपनीतील भ्रष्ट अधिकाऱ्यांची हकालपट्टी करावी.**

- **कामगारहिताचे निर्णय न घेता व्यवस्थापननेसोबत हातमिळवणी करून कामगारांची फसवणूक करत आहे. व्यवस्थापन तसेच मान्यताप्राप्त युनियन यांनी कुठलाही ठोस निर्णय न घेतल्यामुळे अद्यापपर्यंत २२ महिने होऊनसुद्धा कामगारांच्या वेतनामध्ये तुटपुंजी पाच हजार रुपयांची वाढ करण्याचा प्रस्ताव देण्यात आला. यातून कामगारांची पिळवणूक केली जात आहे. २०२४ या वर्षासाठी २५० रुपये, २०२५ या वर्षासाठी २५०, २०२६ या वर्षासाठी १२५० आणि २०२७ या वर्षासाठी ३२५० रुपये वाढ करून कामगारांची थट्टा व्यवस्थापन करत आहे, असा आरोप आंदोलक कामगारांनी केला.**

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

दैनिक विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू






महत्त्वाचे



## महापुरुषांच्या प्रतिमेचा अवमान करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा : वंचित बहुजन आघाडी

**▸विदर्भ केसरी। दर्यापूर(ता.प्रतिनिधी)-**

दिनांक १६./२/२०२६ रोज सोमवारला वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष चंदू भाऊ रायबोले यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख उपस्थिती जिल्हाध्यक्ष संजय भाऊ चौरपगार जिल्हा महासचिव साहेबराव वाक पांजर यांच्या प्रमुख उपस्थितीत तहसीलदार दर्यापूर यांचे मार्फत मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांना निवेदन देण्यात आले निवेदन देतेवेळी जिल्हा उपाध्यक्ष जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण भाऊ राजुरकर, श्रीकृष्ण भाऊ वानखडे, अविनाश आठवले, अमोल गावंडे, शुभम खंडारे, श्रीकृष्ण काका पळसपगार, विजुभाऊ चोरपगार, महिला आघाडीच्या रेखाताई इंगळे, सिद्धार्थ खंडारे, विकास खंडारे, निखिल कांबळे, आशिष खाडे, संजू भाऊ घरडे, सविचंद्र चोरपगार, अनिरुद्ध लोणारे, प्रफुल भोवते, देवराव वाक पांजर, बी.सी जवंजाळ आदी उपस्थित होते.

## महाशिवरात्री निमित्त श्री हरिहर संस्थान येथे भाविकांची मोठी गर्दी

**▸विदर्भ केसरी। प्रतिनिधी अमोल धवसे**

नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील शिरपूर येथील २२६ वर्षे जुने जागृत श्री



महादेव देवस्थान येथे महाशिवरात्री निमित्ताने दर्शनासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली. दरवर्षीप्रमाणे यंदाही संस्थानाच्या वतीने भव्य यात्रा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हजारो भाविकांनी दर्शन घेत महाप्रसादाचा लाभ घेतला.या कार्यक्रमाला आमदार प्रताप अडसड, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अमरावती चे उपाध्यक्ष अभिजीत ढेपे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख तसेच अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली. सन १८०० पासून स्थिर असलेल्या या पुरातन मंदिराजवळ त्रिवेणी संगम असून येथे बेंबळा नदी, जडून नदी व चांदणी नदी यांचा संगम होतो. या संगमस्थळी स्व. मुरारजी पाटील पुसदकर यांना महादेवाची पिंड सापडली होती व त्यांनी सन १८०० मध्ये तिची स्थापना केली. इंग्रज राजवटीत सन १८७० मध्ये मंदिरासाठी १ एकर ४२ गुंठे जमीन देण्यात आली होती. सन १९०४ मध्ये येथे यज्ञ करून उरलेल्या साहित्याच्या विक्रीतून सुमारे ८०० रुपयांत मंदिराचे बांधकाम करण्यात आले होते. भाविकांच्या मते, एकदा त्रिवेणी संगमाचा पूर थेट देवाच्या पिंडीवरून वाहून गेला तरीही मंदिराला कोणतेही नुकसान झाले नाही. आजही हे मंदिर श्रद्धा व विश्वासाचे प्रतीक म्हणून भक्कम उभे आहे. महाशिवरात्री निमित्ताने भाविकांची मोठी गर्दी झाल्याने परिसर भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाला.

## आयडीए यवतमाळ शाखेतर्फे महिला बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे यशस्वी आयोजन

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ प्रतिनिधी**




यवतमाळ : आयडीए यवतमाळ टीमच्या वतीने आयोजित महिला बॉक्स क्रिकेट स्पर्धा (सीझन १) उत्साह, क्रीडाभावना आणि दंतवैद्यकीय क्षेत्रातील ऐक्याच्या वातावरणात मोठ्या दिमाखात पार पडली. या स्पर्धेमुळे क्रिकेटप्रेम आणि दंतवैद्यकीय व्यावसायिकांमधील बंधुभावाचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. स्पर्धेची सुरुवात भव्य उद्घाटन समारंभाने झाली. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून प्रियदर्शिनी उईके (नगराध्यक्षा, यवतमाळ) तसेच सारिका फुसे (पीएसआय, यवतमाळ) उपस्थित होत्या. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे स्पर्धेला उत्साहपूर्ण प्रारंभ झाला. प्रमुख पाहुण्यांचा आयडीए यवतमाळ आयोजन समितीतर्फे सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. संस्थेच्या यशस्वी आयोजनामागे अध्यक्ष डॉ. प्रशांत तामगडगे, डॉ. आकाश कुडमथे, सचिव डॉ. वैभव आगरकर यांचे मार्गदर्शन लाभले. क्रीडा समन्वयक डॉ. गौरव ठाकरे, डॉ. प्रियका धवणे, डॉ. उल्का खरात आणि डॉ. आशुतोष मिट्टकवाड यांनी नियोजनबद्ध कार्यपद्धतीद्वारे स्पर्धा सुरळीत पार पाडली. वुमेन्स विंग संयोजक डॉ. स्नेहलता गोफणे, डॉ. पूजा कलंत्री, डॉ. करुणा कोटेचा आणि डॉ. रश्मी तामगाडगे यांनी सातत्यपूर्ण आणि उत्कृष्ट समन्वय साधत स्पर्धेच्या यशात मोलाचा वाटा उचलला. प्रशिक्षक डॉ. चेतन दरने यांच्या उत्कृष्ट मार्गदर्शनामुळे खेळाडूंनी कौशल्यपूर्ण आणि जिद्दी कामगिरी सादर केली. स्थळ: RSK Turf एकूण सहभागी खेळाडू: ४० एकूण उपस्थिती (लहान मुलांसह): सुमारे २५० सहभागी संघ व कर्णधार:
1. आयडीए यवतमाळ – डॉ. उल्का खरात 2. आयएमए यवतमाळ – डॉ. राठोड 3. नीमा यवतमाळ – डॉ. डहाके 4. आयआयएचपी यवतमाळ – डॉ. मारू चार संघांमध्ये रंगलेल्या सामन्यांनी प्रेक्षकांना रोमांचक अनुभव दिला. उत्कृष्ट संघभावना आणि खेळाडूंच्या जोशपूर्ण कामगिरीमुळे खऱ्या अर्थाने क्रीडास्पर्धेचा आत्मा अनुभवायला मिळाला. विजेत्या व उपविजेत्या संघांना अनुक्रमे ₹७,००० व ₹५,००० रोख पारितोषिकांसह ट्रॉफी प्रदान करण्यात आल्या. तसेच वुमन ऑफ द सिरीज, प्रत्येक सामन्यातील वुमन ऑफ द मॅच, सुपर सिक्स पुरस्कार व पदके देऊन खेळाडूंना गौरविण्यात आले.

- **महिला बॉक्स क्रिकेट – सीझन १ स्पर्धा यशस्वी व संस्मरणीय ठरविल्याबद्दल सर्व सहभागींचे अभिनंदन करण्यात आले. भविष्यात आणखी भव्य आणि उत्कृष्ट क्रीडा उपक्रम राबविण्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला, अशी माहिती अध्यक्ष डॉ. प्रशांत तामगडगे यांनी दिली.**

# कही पे कारवाई, कही पे प्यार!

## ऐसा क्यु यार! मोजक्याच बसेसवर कारवाई; उर्वरितांना 'आशीर्वाद'?

**▸विदर्भ केसरी। मनिष शिरभाते**




**यवतमाळ—** जिल्ह्यातील खाजगी बस वाहतुकीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. काही दिवसांपूर्वी विभागाकडून नियमांचे पालन करण्याबाबत परिपत्रक काढण्यात आले होते. त्यानंतर मोजक्याच खाजगी बसेसवर कारवाई झाल्याची माहिती पुढे आली; मात्र उर्वरित बसेसविरोधात कोणती ठोस पावले उचलली गेली, याबाबत संभ्रम कायम आहे. त्यामुळे "निवडक कारवाई" होत असल्याचा आरोप जोर धरू लागला आहे.

स्थानिक बसचालक व प्रवाशांमध्ये चर्चा आहे की, काही बसेसवर दंडात्मक कारवाई दाखवून उर्वरितांकडे दुर्लक्ष केले जात आहे. यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर संशय व्यक्त केला जात असून, काही बसमालकांकडून "लक्ष्मी लाभ" तर मिळत नाही ना, असा सवाल उपस्थित केला जात आहे. कार्यालयात एका एजंटचे नाव चर्चेत असल्याचे बोलले जात आहे. हा एजंट अनेक व्यवहारांमध्ये प्रभावी भूमिका बजावत असल्याची चर्चा असून, विविध कामांमध्ये तो 'सर्वेसर्वा'प्रमाणे वावरतो, अशीही कुजबुज आहे.

काही मोठ्या व्यवहारांमध्ये त्याचा सहभाग असल्याचा संशय व्यक्त केला जात असून, "कार्ड वाटप" आणि इतर आर्थिक डिलिंगमध्ये त्याचा हात असल्याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. मात्र या सर्व बाबींची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही.

### सुरक्षा नियमांकडे दुर्लक्ष?

- **प्रवाशांच्या म्हणण्यानुसार अनेक खाजगी बसेसमध्ये खालील अनिवार्य बाबींची पूर्तता होत नसल्याचे दिसते— वैध फिटनेस प्रमाणपत्र, विमा व परवाना अद्ययावत असणे, कार्यरत अग्निशामक यंत्र (Fire Extinguisher), आपत्कालीन बाहेर पडण्याचे दरवाजे व हॅमर, स्पीड गव्हर्नर व वेगमर्यादेचे पालन, काही बसेस भरधाव वेगाने धावत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. विशेषतः मागील काही "बर्निंग बस" घटनांनंतरही तपासणी मोहीम सातत्याने राबवली जात नसल्याचा आरोप होत आहे.**

### प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न

- **नियमांचे काटेकोर पालन न झाल्यास प्रवाशांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व खाजगी बसेसची सखोल तपासणी करून कागदपत्रांची पडताळणी व त्रुटींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिक व सामाजिक संघटनांकडून होत आहे.**

### अधिकाऱ्यांची भूमिका काय?

- **या संदर्भात संबंधित विभागाकडून अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नसली, तरी जनतेच्या सुरक्षेसाठी कारवाई पारदर्शक आणि सर्वसमावेशक असावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने या सर्व आरोपांवर स्पष्ट भूमिका घेऊन शंका दूर कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे. जिल्ह्यातील खाजगी बस वाहतुकीवर निर्माण झालेले हे प्रश्नचिन्ह दूर करण्यासाठी ठोस व पारदर्शक पावले उचलली जातात का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**



## दर्यापूरात शिवजयंतीला रील स्टारची भाऊगर्दी



### शिव मॅरेथॉन स्पर्धा रंगणार;एक लक्ष रुपयांच्या बक्षिसाची लयलूट

**▸विदर्भ केसरी। दर्यापूर**

सूर्योदय सामाजिक प्रतिष्ठान दर्यापूर व शिवजयंती उत्सव समिती शिवर,आयइआय,आयइवा यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या तीन वर्षापासून १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त आयोजन भव्य शिव मॅरेथॉन स्पर्धेचे यावर्षी सुद्धा दर्यापूर येथे आयोजन करण्यात आले आहे.

दर्यापूर शहरातील बस स्थानक समोरील कन्या शाळा मैदान येथे या भव्य शिव मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन सकाळी ६ वाजता करण्यात आले आहे.यावेळी बक्षीस वितरण सकाळी ८ वाजता खासदार बळवंतराव वानखडे व उद्घाटक म्हणून नगराध्यक्ष सौ मंदाकिनीताई सुधाकरराव भारसाकळे व प्रमुख पाहुणे म्हणून पदवीधर मतदार संघाचे आमदार धीरज लिंगाडे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारणी सदस्य हेमंतदादा काळमेघ,ठाणेदार सुनील वानखडे व विविध मान्यवर यांची उपस्थिती लाभणार आहे. यावेळी सोशल मीडियावरील सुप्रसिद्ध रील स्टार गाऊन वाली बाई म्हणून प्रसिद्ध असलेल्या रश्मी सोनोने व लाडके दाजी सारंग सोनोने, विदर्भाची वऱ्हाडी भाषा प्रसिद्ध करणारे बिपिन माहूरे व तनवी काकड,महिला बॉडी बिल्डर स्वाती गाडे, सामाजिक संदेश देणारे चेतन ढोके,अर्पित तलवार यांची उपस्थिती प्रमुख आकर्षण ठरणार आहे. सदर स्पर्धेत एकूण १० गट राहणार असून एकूण १ लक्ष रुपयांची बक्षिसे स्पर्धकांना मिळणार आहेत.

तरी अधिक माहिती करिता मो. ७४२०९०८९७२ संपर्क साधावा असे आवाहन शिव मॅरेथॉन आयोजन समिती तर्फे करण्यात आले आहे.

## रानडुकराचा महिलेवर हल्ला

**▸विदर्भ केसरी। ढाणकी**



कापूस वेचणीचा हंगाम सुरू असतानाच शेतशिवारात रानडुकरांनी उच्छाद मांडला आहे. आज दुपारी २:३० वाजेच्या सुमारास सावळेश्वर येथील शेतमजूर महिला करुणा दलितांनंद काळबांडे वय 35 वर्ष यांच्यावर रानडुकराने प्राणघातक हल्ला केला. या भीषण हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्या असून परिसरात दहशतीचे वातावरण पसरले आहे. करुणा काळबांडे शेतात कापूस वेचण्याचे काम करत होत्या. भरदुपारी अचानक दबा धरून बसलेल्या रानडुकराने त्यांच्यावर भीषण हल्ला चढवला. हल्ल्यात गंभीर जखमा झाल्याने त्यांना तातडीने ढाणकी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. जखमा खोल आणि गंभीर असल्याने ढाणकी येथील डॉक्टरांनी त्यांच्यावर प्राथमिक उपचार करून त्यांना तातडीने यवतमाळ येथील जिल्हा रुग्णालयात रेफर केले आहे. भरदुपारी झालेल्या या हल्ल्यामुळे शेतात काम करणाऱ्या इतर मजुरांमध्ये मोठी भीती पसरली आहे. कापूस वेचणीचा महत्त्वाचा काळ असताना वन्यप्राण्यांच्या या हल्ल्यांमुळे मजुरांनी शेतात जाण्यास धास्ती घेतली आहे. वनविभागाने या घटनेची दखल घेऊन तत्काळ पंचनामा करावा आणि पीडित महिलेच्या उपचाराचा खर्च उचलून कुटुंबाला आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## बेकायदेशीर उत्खननाच्या आरोपांवरून ५० लाखांची कायदेशीर नोटीस ; मौद्यात खळबळ

**▸विदर्भ केसरी। नागपूर/मौदा :**

मौदा येथील व्यावसायिक श्री. दिलीप फकीरा दुपारे (रा. प्रगती नगर, मौदा, जि. नागपूर) यांच्या वतीने ॲड. सविधान हनुमंत नागराळे (नागपूर) यांनी काही व्यक्तींना तब्बल ५० लाख रुपयांच्या अब्रूनुकसानीची कायदेशीर नोटीस बजावली असून, या प्रकरणामुळे मौदा–कुही परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. नोटीसनुसार, एमव्हीएम लाईव्ह न्यूज चॅनेलवर थेट प्रक्षेपणातून उल्हास मेश्राम

आकाश अरुण भोयर.भागेस्वर तुलसीराम फेंडर . निर्धन खुशाल निंभर्ते यांनी दिलीप दुपारे यांच्यावर कुही-वेलतूर परिसरात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर मुरूम उत्खनन केल्याचे गंभीर आरोप केल्याचा दावा करण्यात आला आहे.

सदर आरोपांमध्ये ५०० ब्रास परवानगी असताना २००० ब्रासपेक्षा अधिक उत्खनन केल्याचे, शासनाची तब्बल २ ते २.५ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे तसेच तहसीलदारांनाही जबाबदार धरत संगनमताचा सूचक आरोप केल्याचे नमूद आहे. एवढेच नव्हे तर "एका रॉयल्टीवर अनेक फेऱ्या" मारून शासनाचे नुकसान केल्याचा आरोपही थेट प्रक्षेपणात करण्यात आल्याचा उल्लेख नोटीसमध्ये आहे.

मात्र, श्री. दिलीप फकीरा दुपारे हे मागील २५ वर्षांपासून उत्खनन व मशिनरी व्यवसायात कार्यरत असून सर्व परवानग्या व रॉयल्टी कायदेशीररीत्या घेतल्याचा त्यांचा दावा आहे. कोणतीही अधिकृत कागदपत्रे तपासल्याशिवाय जाणीवपूर्वक बदनामी करण्याच्या हेतूने खोटे आरोप केल्यामुळे त्यांच्या व्यावसायिक प्रतिमेला मोठा धक्का बसला असून सुमारे ५० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे नोटीसमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.

- **तसेच काही जणांनी राजकीय पार्श्वभूमीचा उल्लेख करत दबाव टाकण्याचा प्रयत्न केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. "खोट्या व बिनपुराव्याच्या आरोपांनी प्रतिष्ठा मलीन करण्याचा कट" असल्याचा सूर नोटीसमध्ये उमटला आहे.**
- **या पार्श्वभूमीवर संबंधितांना ७ दिवसांच्या आत ५० लाख रुपये नुकसानभरपाई अदा करण्याचे आदेश देण्यात आले असून, अन्यथा दिवाणी तसेच फौजदारी स्वरूपाची कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. तसेच नोटीस खर्चापोटी २५ हजार रुपयांचीही मागणी करण्यात आली आहे.**
- **दरम्यान, या कायदेशीर नोटीसीमुळे मौदा–कुही तालुक्यात राजकीय व सामाजिक वर्तुळात चर्चांना उधाण आले असून, पुढील कायदेशीर घडामोडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

## 'त्या' आरोपींची नार्को टेस्ट करा

### माजी जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांची जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी

**▸विदर्भ केसरी। दर्यापूर -**



शक्तीसिंह वीरेंद्रसिंह दिक्षित व सुमंत अरविंद पाटील या अवैध सावकार यांच्या घरी उपनिबंधक कार्यालय अमरावती मधील कर्मचारी यांनी धाड टाकून अवैज , संशयास्पद कागदपत्रे जप्त करण्यात आले होते त्यानुसार त्यांनी अमरावती जिह्या मधील ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेला मानसिक व शारीरिक त्रास दिल्याचे दिसून येत आहे त्यावरूनच त्याचे दोन वर्षाचे फोन पे बँक अकाउंट चेक करावे त्याच्या फॅमिली च्या नावाने व्याजाचे बरेच पैसे आले आहेत ते पण चेक करावे नोटरी करुन कोरे चेक घेऊन मित्राच्या नावाने चेक बाउंस करुन अश्या अनेक केसेस यांनी केल्या आहेत त्याची चौकशी करावी त्यांचे नेटवर्क असलेले कारंजा,अकोला, बुलढाना व अमरावती जिल्ह्यामध्ये यांची प्रॉपर्टी ची चौकशी करावी चेक देणाऱ्या घरच्याचे घेतलेले सोन दागिने चेक करा घेणारा व देणारा या दोघांची नार्को टेस्ट घ्या त्या मध्ये किती लोकांवर यांनी अन्याय केले आणि व्याजासाठी अजून काय काय अन्याय केले समोर येईल यांना रोड टच जमीन दोन एकर 6 लाख मध्ये कशी भेटते ही चौकशी करा वरील सर्व मुद्द्यांच्या आधारे निःपक्ष पणे चौकशी करुन गुन्हा दाखल करावा याच्या मध्ये गुंतलेल्या लोकांना धमक्या देऊन प्रकरण निपटवण्याचा यांचा प्रयत्न चालू आहे यांना कस्टडी मध्ये घेऊन चौकशी व्हावी अशी आग्रहाची मागणी माजी जिल्हाप्रमुख शिवसेना अमरावती गोपाल पाटील अरबट यांनी जिल्हाधिकारी अमरावती यांच्या कडे केली आहे आता जिल्हाधिकारी आता काय निर्णय घेणार हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे व हे निवेदन पोलिस अधीक्षक ग्रामीण यांना सुद्धा देण्यात आले आहे.

## शासनाचे प्रत्येक धोरण जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याचा नोंदणी विभागाचा मानस

**▸विदर्भ केसरी। दर्यापूर**




नोंदणी व मुद्रांक विभाग अमरावती यांच्या कृतिशील व लोकाभिमुख प्रशासनाच्या धर्तीवर जनतेशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यांच्या प्रश्नांना वाच्या फोडण्यासाठी तसेच 15-11-1965 ते 15-10-2024 या कालावधीतील अनोंदनिकृत दस्तांची नियमितीकरण करण्यासंदर्भात लोकांचा संभ्रम दूर करून त्यांना मार्गदर्शन मिळण्यासाठी सह दुय्यम निबंधक कार्यालय,दर्यापूर येथे जनता दरबार व जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते व मोठ्या थाटात हा उपकरण यशस्वीरीत्या पार पडला. या उपक्रमास लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तसेच या कार्यक्रमाच्या माध्यमातून जनसामान्यांच्या अडचणी जाणून घेऊन त्यांना समाधानकारक मार्गदर्शन करून त्यांना त्यांच्या समस्या निराकरणाबाबत आश्वासन देण्यात आले.व या उपक्रमामुळे लोकांना मोठ्या प्रमाणात माहिती मिळाली असून त्यांच्या बऱ्याच प्रश्नांचे समस्यांचे निराकरण करण्यात आले. या कार्यक्रमाला लाभलेले प्रमुख मार्गदर्शक मा सहजिल्हा निबंधक वर्ग-१,तथा मुद्रांक जिल्हाधिकारी,अमरावती श्री अनिल औतकर साहेब यांनी थेट जनतेपर्यंत पोहचून त्यांच्या प्रत्येक समस्यांना जाणून त्यांना योग्य ते मार्गदर्शन केले तसेच या कार्यक्रमास मा श्री राजेंद्रकुमार कानडजे तहसीलदार,दर्यापूर,श्री पालिकोंडावार साहेब, सह दुय्यम निबंधक दर्यापूर, कु.प्रिया ढोके लिपीक सहदुय्यम निबंधक कार्यालय दर्यापूर,ऑपरेटर स्नेहल इंगोले दस्त लेखक राजेंद्र नागपुरे, व इतर गावकरी मंडळी हजर होते...या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सारिका भेंडे मॅडम यांनी केले.

## राजोला जिल्हा परिषद अंतर्गत गावांच्या मूलभूत सुविधांसाठी मुख्यमंत्री यांना निवेदन

**▸विदर्भ केसरी। राजहंस शेंडे**

नागपूर, दि. १८ फेब्रुवारी —– राजोला जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या गावांतील प्रलंबित मूलभूत सुविधा तातडीने पूर्ण करण्यात याव्यात, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते सौ. सरलताई संजीव बारई व श्री संजीव सोमाजी बारई (रा. हरदोली पुनर्वसन, ता. कुही, जि. नागपूर) यांनी मुख्यमंत्री यांना निवेदन सादर केले आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, राजोला पंचायत समिती व साळवा पंचायत समिती क्षेत्रातील नागरिकांना रस्ते, पिण्याचे पाणी, वीज, नाली व्यवस्था यांसारख्या मूलभूत सुविधांचा तीव्र अभाव जाणवत आहे. त्यामुळे नागरिकांना दैनंदिन जीवनात मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

निवेदनातील प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे —– कुही – राजोला –आवरमारा मुख्य रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करावे. कुही – भटरा – अडम रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करावे. भटरा – बीड – नेवरी रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करावे, अडम – लोहारा – चिखलाबोडी – नेवरी – अडंम– साळवा मार्गाचे सिमेंट काँक्रीटीकरण करावे, हुडपा – देवळी – खेंडा – कुजवा – चिचाळ – चन्रा रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करावे, मांजरी – खेंडा – देवळी रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करावे. माजरी खेंडा गावालगत नाल्यावर संरक्षक भिंत उभारावी (पूरपरिस्थिती टाळण्यासाठी). कुजबा– टाकळी – खुरसापार – सावरखंडा रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करावे. कुही – बोडखीपेठ – खोबना – खरबी – चापेगडी – सावंगी – आगरगाव रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करावे. चापेगडी –मोहगाव –चिचघाट रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करावे. खोबना – साळवा रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करावे. मौजा आवरमारा, टाकळी, कुजबा गावांचे गोसे बंधारा क्षेत्र निर्मितीमुळे तातडीने पुनर्वसन करावे. पुनर्वसित गावांमध्ये डांबरी रस्ते, नाली व्यवस्था, पिण्याचे पाणी, वीज व्यवस्था तसेच लोकवर्गणी मैदानाचे सौंदर्यीकरण करावे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, वरील सर्व मागण्या तातडीने मंजूर करून संबंधित विभागांना आवश्यक निर्देश द्यावेत. अन्यथा नागरिकांच्या वतीने पुढील आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

## विशुद्ध विद्यालय संस्थेच्या अध्यक्षपदी विनायक दाते यांची फेरनिवड




**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

बाबाजी दाते यांनी स्थापन केलेल्या विशुद्ध विद्यालय, यवतमाळ या संस्थेच्या कार्यकारिणीची सन 2026 ते 2031 या कालावधीसाठी नुकतीच निवडणूक झाली. अविरोध निवड झालेल्या कार्यकारिणीने आज बुधवार, दिनांक 18 फेब्रुवारी 2026 रोजी कार्यभार स्वीकारला. नूतन कार्यकारिणीमध्ये सात पदाधिकाऱ्यांचा समावेश असून संस्थेचे अध्यक्ष म्हणून विनायक श्रीकृष्ण दाते यांची फेरनिवड करण्यात आली. संस्थेच्या उपाध्यक्षपदी अखिलेश वसंतराव पेशवे, सचिव म्हणून विजय दामोदर कासलीकर, सहसचिवपदी मीरा मंगेश केळकर, कोषाध्यक्ष म्हणून मंगेश शरदराव केळकर आणि सदस्य म्हणून सुषमा विनायक दाते व मनीषा दाते-साठे यांची निवड करण्यात आली. बाबाजी दाते शारीरिक प्रशिक्षण महाविद्यालयाचे निवृत्त प्राचार्य डॉ. राजेंद्र क्षीरसागर यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. आज सकाळी बाबाजी दाते यांच्या घरी झालेल्या या नूतन कार्यकारिणीच्या पहिल्या सभेस उपस्थित सर्व पदाधिकारी तथा सदस्यांचे विशुद्ध विद्यालय अंतर्गत विविध घटक संस्थांच्या प्रमुखांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व नव्या कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

## जत्रेला न नेल्याने महिलेला मारहाण

■ यवतमाळ : काठीनं घोंगडं घेऊ द्या की रं... मला बी जत्रंला येऊ द्या की रं... हे लोकगीत प्रसिद्ध आहे. पण मला जत्रेला का घेऊन गेले नाही, अशा कारणातून एका इसमाने चक्क महिलेला गंभीर मारहाण केली. ही अजब घटना पुसद तालुक्यातील रोहडा नावाच्या खेड्यात घडली. महाशिवरात्रीनिमित्त पुसद तालुक्यातील प्रसिद्ध कारला येथील मंदिरात जत्रा होती. हे मंदिर पंचक्रोशीत प्रसिद्ध असल्याने दरवर्षी येथे अनेक भाविक गर्दी करतात. रोहडा गावातील काही जण कारला मंदिरात दर्शनासाठी गेले होते. त्यात लक्ष्मी दत्ता पायघन (५०) याही कारला मंदिरात गेल्या होत्या. मात्र दर्शन घेऊन परत आल्यानंतर गावात त्यांच्यापुढे नवे संकट उभे होते. दुसऱ्या दिवशी त्यांची घरी रामेश्वर महादेव वाठ (४०) रा. रोहडा हा इसम येऊन धडकला.

**महत्त्वाचे**



## जगतगुरु संत रविदास महाराज यांची जयंती उत्सव साजरी

**▸विदर्भ केसरी। आर्णी प्रतिनिधी:बबिता शिवणकर**

आर्णी येथील गुरु रविदास बहुउदेशिय संस्थाच्या वतीने जगतगुरु संत रविदास महाराज यांची जयंती उत्सवात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमा निमित्य संत रविदास नगर येथुन भव्य शोभायात्रा काढण्यात आली.त्या नंतर रेणुका मंगल कार्यालय येथे कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सुधाकर उध्दव वाडेकर, सत्कारमूर्ती म्हणून नवनिर्वाचित नगराध्यक्ष मा. श्री. नालंदाजी भरणे साहेब , उपनगराध्यक्ष मा.श्री.निलेशभाऊ गावंडे व यवतमाळ नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगरसेविका सौ. स्वाती अभिलाष खंडारे , कार्यक्रमाचे उदघाटक आर्णी चे ठाणेदार मा.श्री.निलेश सुरटकर प्रमुख पाहुणे म्हणून श्री.सुरेश खंडारे, श्री.हरीभाऊ खंडारे, श्री.देवानंद पांढरे प्रमुख वक्ते मा.श्री.गजानन घुबडे हे होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीकांत वानखडे यांनी केले त्यानंतर मान्यवरांचे मार्गदर्शन झाले. त्या नंतर मा.श्री.गजानन घुबडे यांनी गुरू रविदास महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. यावेळी दलित मित्र लक्ष्मणराव कोरटकर यांच्या स्मृति प्रित्यर्थ श्री.रमेश कोरटकर यांच्याकडुन छोट्या छोट्या चिमुकल्यांच्या भाषणाला बक्षीस देण्यात आली. या कार्यक्रमाचे संचालन सौ दीक्षा गोडवे आभार अनिल खंडारे यांनी केले.या कार्यक्रमाला गुरु रविदास महिला आघाडीच्या अध्यक्षा श्रीमती लिलाबाई वानरे, गुरु रविदास युवा मंच अध्यक्ष रोहित पाटील यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनिल खंडारे,राजु वाडेकर, संतोष पाचखंडे, गणेश पांढरे, संतोष गोडवे, मनोज माघाडे, निळकंठ पाटेकर, गजानन गोडवे, दिपक वानरे, संतोष र.पाचखंडे, श्रावण सोनटक्के, विजय वासनिक, भास्कर भोकरे, राजु धाडवे, विशाल वाडेकर,वैभव माघाडे, प्रतिक वाडेकर, विक्रांत नाचणे ,शुभम वाडेकर, राहुल पानझडे, साई वानखडे,लखन भोकरे,उमेश गोडवे, अनिकेत खंडारे,चंचल इंगळे,निता खंडारे, सोनू पाचखंडे, सारिका गोडवे, सविता वाडेकर, रिमा गोडवे,वनिता वाडेकर, स्वाती वानखडे, यांनी परीश्रम घेतले




## 'शिवप्रेमी-फुलेप्रेमी कोश्यारींच्या "पद्मभूषण" पुरस्कार वापसी साठी संतप्त'

**▸विदर्भ केसरी। पांढरकवडा :**

-छत्रपती शिवाजी महाराज व क्रांतीसूर्य महात्मा फुले,सावित्रीबाई फुले यांच्या बद्दल अपमानजनक वक्तव्य करणाऱ्या भगतसिंग कोश्यारी यांचा पद्मभूषण पुरस्कार रद्द करण्यासाठी अखिल भारतीय माळी महासंघ व बहुजन विचारधारा प्रणित जयंती उत्सव समिती यांनी दिले निवेदन.माजी राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांचा पद्मभूषण पुरस्कार करण्यासाठी तहसीलदार पांढरकवडा यांच्याद्वारे महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांना अ.भा.माळी महासंघ,जयंती उत्सव समितीने दि.१८ फेब्रुवारी २०२६ ला निवेदन दिले."समर्थ के बिना सिवाजी को कौन पूछता?"सिवाजी पुराने समय के आदर्श थे|"व"दस साल की उम्र में सावित्रीबाई की शादी तेरा साल के ज्योतीबा फुले के साथ हुयी,दस साल की लडकी और तेरा साल का लडका शादी के बाद क्या करते है|" महामानवांबद्दल अशी निंदनीय वक्तव्य करणाऱ्या महाराष्ट्राच्या माजी राज्यपालाला"पद्मभूषण "सारखा सर्वोच्च सन्मान देणे म्हणजे हा महामानवांचा,लोकशाही व संविधानाचाही अपमान आहे.या निर्णयाचा जाहीर निषेध आपल्या संतप्त प्रतिक्रियेतून राम भेंडारे,जिल्हा अध्यक्ष अखिल भारतीय माळी महासंघ अमोल गुरनुले विदर्भ संघटक अखिल भारतीय माळी महासंघ,सुषमाताई राजदीप,युवा वक्ता प्रा,प्रतीक्षा गुरनुले,राहुल जोगदंडे,अशोक भोयर यांनी व्यक्त केला. यावेळी सौ.जयश्री शेंडे (न.प.महिला व बालकल्याण उपसभापती) सौ.रेखाताई मोहुर्ले,अशोकराव भेंडाळे,सोनेराव कोटनाके,बाबाराव शेंडे,नागेश मोहुर्ले,मनोज भोयर,गंगाधर बकाले,मोरेश्वर डेहनकर,राजू पुणेकर,राहुल भेंडाळे,रवि रामटेके,वसीम सय्यद,दिनेश चौधरी,शुभांगी शेंडे,मंदा वाढई,निता वाढई,माया शेंडे,मंगला वाढई,रंजना शेंडे,रसीका पेन्दोर,यांसह शहरांतील विविध सामाजिक संघटनेतील कार्यकर्ते उपस्थित होते.

## खरूस खुर्द - टेंभूरदरा रस्त्यावर भीषण अपघात; बिटरगाव बु. येथील तरुणाचा मृत्यू

**▸विदर्भ केसरी। ढाणकी (प्रतिनिधी): मिलिंद चिकटे**

खरूस खुर्द ते टेंभूरदरा दरम्यान झालेल्या एका भीषण रस्ता अपघातात २३ वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. माधव मारुती बडेवार (वय २३ वर्ष, रा. बिटरगाव बु.) असे मृत युवकाचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शनिवार, १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळच्या सुमारास खरूस खुर्द ते टेंभूरदरा रस्त्यावर अपघात झाल्याची माहिती फोनद्वारे बिटरगाव पोलीस ठाणेदार पांडुरंग शिंदे यांना मिळाली. घटनेची माहिती मिळताच बिटरगाव पोलीस ठाण्याचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी रवाना झाले. पोलिसांनी अपघातग्रस्त युवकाला तातडीने उपचारासाठी ढाणकी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले.डॉक्टरांनी तपासून माधव बडेवार याला 'मृत' घोषित केले व बिटरगाव परिसरामध्ये या घटनेमुळे हळहळ व्यक्त होत आहे या घटनेची माहिती तातडीने मृताच्या नातेवाईकांना देण्यात आली. पुढील तपास बिटरगाव पोलीस ठाणेदार पांडुरंग शिंदे, यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार रोशन सरनाईक , रवी गीते, मोहन चाटे, जाधव, हे करत आहेत.

## अवैध रेतीच्या ट्रॅक्टरसह दोघांवर गुन्हा

यवतमाळ : ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये अवैध रेती घेवून जाणाऱ्या दोघांवर कळंब पोलिसांनी गुन्हा दाखल केला. कळंबचे महसूल अधिकारी अंकीत चंद्रशेखर उमरतकर यांनी ही रेती कळंबच्या शिवशक्ती शाळेजवळ १६ फेब्रुवारी रोजी पकडली. निलेश ज्ञानेश्वर सोयाम (३९) रा. बसस्थानकासमोर पार्डी ता. कळंब आणि प्रदीप गुणवंत कदम (५०) रा. दोनोडा या दोघांवर रेती चोरी प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर त्यांच्याकडून रेतीचा ट्रॅक्टर (एमएच २९ बीपी २१६६) तसेच १ ब्रास रेती असा एकंदर ५ लाख ८ हजार रूपयांचा मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी महसूल अधिकारी उमरतकर यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बच्चू कडू पुन्हा उतरणार मैदानात!

## शेतकरी व आदिवासींच्या न्यायहक्कांसाठी मेळघाटात २५० किमी पदयात्रेची घोषणा

**▸विदर्भ केसरी। शिरसगाव कसबा प्रतिनिधी अक्षय गुर्जर**



मेळघाट व दुर्गम भागातील शेतकरी, आदिवासी आणि मजूर वर्गाच्या वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या मूलभूत प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी माजी आमदार बच्चू कडू यांनी मेळघाटात २५० किलोमीटरची पदयात्रा काढण्याची घोषणा केली आहे.

विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असून शेतकरी कर्जबाजारीपणा, रोजगाराचा अभाव, आरोग्य व शिक्षणाच्या सुविधांची दयनीय अवस्था, वीज, पाणी, रस्ते आणि मोबाईल नेटवर्कचा अभाव यामुळे नागरिकांचे जीवन अत्यंत कठीण झाले आहे. सरकारने ३० जून २०२६ पर्यंत कर्जमाफी करण्याचे आश्वासन दिले असताना अद्यापही कोणतीही ठोस अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे १५ मार्च २०२६ पर्यंत कर्जमाफीस पात्र शेतकऱ्यांची यादी जाहीर करावी तसेच दुष्काळ, नापिकी आणि हमीभाव न मिळाल्याने २०२५-२६ चालू वर्षाचीही अतिरिक्त कर्जमाफी द्यावी, अशी ठाम मागणी बच्चू कडू यांनी केली आहे.

मनरेगा अंतर्गत मोठ्या प्रमाणात कामे मंजूर असतानाही प्रत्यक्षात विकासकामे रखडलेली आहेत. शेतीसाठी १०० टक्के अनुदानावर चेन फेंसिंग व सोलर बसविणे, मजुरांचे पैसे एका आठवड्याच्या आत थेट खात्यात जमा करणे आणि उशीर झाल्यास व्याज देणे, अशी मागणी त्यांनी केली आहे. ऑक्टोबर ते एप्रिल या कालावधीत मागेल त्याला काम देण्याचा पाच वर्षांचा आराखडा तयार करावा, ऑनलाईन हजेरीची अट रद्द करून नेटवर्कअभावी ऑफलाईन हजेरी सुरू करावी, अतिरिक्त अधिकारी-कर्मचारी नेमावेत, रोजगार सेवकांना ग्रामपंचायत कर्मचारी दर्जा देऊन समान काम समान वेतन लागू करावे तसेच कंत्राटी भरती प्रक्रिया तात्काळ थांबवावी, अशी भूमिका त्यांनी मांडली.

मेळघाटातील अनेक गावांमध्ये स्वातंत्र्यानंतरही वीज पोहोचलेली नाही. अद्याप अंधारात असलेल्या गावांमध्ये तात्काळ वीजपुरवठा सुरू करावा, स्मार्ट मीटर काढून पारंपरिक मीटर बसवावेत आणि नादुरुस्त सौर कृषीपंप दुरुस्त न होत असल्याने पारंपरिक विद्युत जोडण्या द्याव्यात, अशी मागणीही त्यांनी केली. शिक्षण क्षेत्रात जिल्हा परिषद शाळांमधील रिक्त शिक्षक पदे तात्काळ भरावीत, संगणक व क्रीडा शिक्षक नेमावेत, विद्यार्थ्यांना पोष्टीक आहार मिळावा, शिक्षकांसाठी निवास व्यवस्था उभारावी आणि आश्रमशाळांचा दर्जा सुधारावा, तसेच आदिवासी विद्यार्थ्यांवर होणारा भेदभाव तात्काळ थांबवावा, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे.आरोग्य सुविधांच्या बाबतीत मेळघाटातील ग्रामीण रुग्णालये व आरोग्य केंद्रांमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता असून बालरोग, स्त्रीरोग, नेत्ररोग, हाडांचे डॉक्टर, रक्तपेढी, सीटी स्कॅन, एमआरआय, सोनोग्राफी यांसारख्या सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. धारणी येथे स्वतंत्र स्त्री रुग्णालय उभारावे, चुर्णी ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा दर्जा द्यावा, १०८ रुग्णवाहिकांची संख्या वाढवावी आणि दुर्गम भागासाठी एअर अँब्युलन्सची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

■ **पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये टँकर व्यवस्था व जलशुद्धीकरण यंत्रणा बसवाव्यात, जलजीवन मिशन अंतर्गत झालेल्या कामांची चौकशी करावी, नदी-नाल्यांवर बंधारे उभारावेत तसेच सिंचनासाठी डॅममधून लिफ्ट इरिगेशन योजना राबवावी, अशी मागणीही या पदयात्रेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. मेळघाटातील रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट असल्याने रस्त्यांचे रुंदीकरण, दुर्गम गावांना नवीन रस्ते, सुरक्षित वाहतुकीसाठी लहान बसेस, ट्रॅव्हलर व जीप सेवा सुरू करावी, तसेच आपत्कालीन परिस्थितीत एअरलिफ्टची व्यवस्था असावी, असेही बच्चू कडू यांनी नमूद केले.**

■ **एकूणच ही पदयात्रा मेळघाटातील रोजगार, आरोग्य, शिक्षण, पाणी, वीज, रस्ते, वन्यप्राणी हल्ले आणि कर्जमाफी यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर सरकारला जागे करण्यासाठी काढण्यात येत असून, शासनाने केवळ आश्वासनांवर न थांबता तातडीने ठोस निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा बच्चू कडू यांनी व्यक्त केली आहे.**

## शेतकऱ्यांनी कागदपत्रे सादर करावीत

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

राज्य शासनाच्या प्रस्तावित कर्ज निवारण योजनेसाठी जिल्ह्यातील थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती संकलित केली जात आहे. नेर तालुक्यात एकूण ५ हजार ३९० थकीत सभासद असून त्यापैकी आतापर्यंत ४ हजार ८०५ थकीत शेतकऱ्यांची माहिती संकलित करण्यात आली आहे. उर्वरित ५८५ शेतकऱ्यांनी तात्काळ संबंधित सोसायटीच्या सचिवांकडे किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या.शाखा नेर येथे भेट देऊन आधार कार्ड, फार्मर आयडी व इतर आवश्यक कागदपत्रे जमा करण्याचे आवाहन नेर येथील सहकार अधिकारी एम.एम भगत यांनी केले आहे.

शेती क्षेत्रासह शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजनांच्या अनुषंगाने प्रस्तावित कर्ज निवारण योजनेसाठी विहीत नमुना प्रपत्र अ व ब मध्ये माहिती मागविण्यात आली आहे. सहाय्यक निबंधकांच्या मार्गदर्शनाखाली विहीत नमुन्यात प्रपत्र अ व ब मध्ये माहिती भरण्याचे काम सुरू आहे. ज्या सभासदांचे आधार तपशील अद्याप सेवा सोसायटीकडे प्राप्त झालेले नाहीत, ते प्राप्त करुन घेण्यासाठी सहकार अधिकारी व संबंधित कार्यालयीन कर्मचारी, तसेच संबंधित सहकारी संस्था सचिव किंवा बँकेचे वसुली अधिकारी यांच्याशी संपर्क साधून आवश्यक माहिती व कागदपत्रे सादर करावीत, असे आवाहन नेरचे सहकार अधिकारी मनोज भगत यांनी केले आहे.

## मातोश्री पार्वतीबाई नाईक कॉन्व्हेंटमध्ये विज्ञानाचा प्रसार करण्यासाठी मुलांना प्रोत्साहन पर मार्गदर्शन शिबिर संपन्न

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**



युवक मंडळ, पुसद द्वारा संचालित स्थानिक मातोश्री पार्वतीबाई नाईक कॉन्व्हेंट शाळेमध्ये आज दिनांक 16/02/2026 रोजी विद्यार्थ्यांसाठी विज्ञान प्रसार करण्यासाठी मुलांना प्रोत्साहन पर मार्गदर्शन प्रा. कानिंदे टी.बी ( M.Sc. Physics) यांनी केले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री. बी. एन. खराटे सर , अकॅडमीक हेड सौ. प्रिती पोळकट मॅडम, फॅकल्टी हेड सौ. दिपीका खराटे मॅडम, परीक्षा प्रमुख श्री. नितिन नांदेडकर सर यांच्या शुभहस्ते प्रा.कानिंदे सर व प्रा.आहाळे सर यांचे स्वागत करण्यात आले . यानंतर प्रा. कानिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले की,आजच्या आधुनिक युगात विज्ञान ही काळाची गरज बनली आहे. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारावा यासाठी शाळांमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करणे आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर विज्ञानाचा प्रसारासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना विज्ञानाचे महत्त्व, दैनंदिन जीवनातील विज्ञानाचा उपयोग आणि संशोधन क्षेत्रातील संधी याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. प्रयोगांच्या माध्यमातून शिकण्यावर भर देत विज्ञान विषय सोपा व रंजक कसा होऊ शकतो याचे मार्गदर्शन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना विज्ञान प्रदर्शन, प्रकल्प स्पर्धा, विज्ञान दिन साजरा करणे, तसेच विविध विज्ञान प्रयोगशाळांना भेट देणे यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. विज्ञानामुळे समाजाचा विकास होतो आणि देशाची प्रगती साध्य होते, याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. शेवटी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विज्ञान क्षेत्रात पुढे जाण्याचा निर्धार व्यक्त केला.

कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील शिक्षक श्री. सचिन तळणकर यांनी केले तर शिक्षक श्री.बिजू मुंडावरे यांनी आभार व्यक्त केले.

## यूजीसी समर्थनार्थ पुसदमध्ये एल्गार

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**



भिम आर्मी व आजाद समाज पार्टी कां. यांच्या नेतृत्वाखाली आज उपविभागीय अधिकारी कार्यालय, पुसद जि. यवतमाळ येथे यूजीसी कायदा समर्थनार्थ शांततापूर्ण आंदोलन करण्यात आले. उच्च शिक्षण क्षेत्रात सामाजिक न्याय, घटनात्मक आरक्षण, शिष्यवृत्ती तसेच विद्यार्थी व शिक्षकांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे आणि यूजीसी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी, या मागण्यांसाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आले होते.

यावेळी भीम आर्मी जिल्हाध्यक्ष अशोक भालेराव यांनी आपल्या मनोगतात उच्च शिक्षणातील सामाजिक न्याय अबाधित ठेवण्याची गरज व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, केंद्र सरकारने तात्काळ अध्यादेश आणून एससी एसटी ओबीसी विद्यार्थ्यांना सहकार्य करावे व विद्यार्थ्यांच्या हक्कांवर कुठलाही आघात सहन केला जाणार नाही अशी भूमिका त्यांनी व्यक्त केली तसेच आजाद समाज पार्टी कां. युवा जिल्हाध्यक्ष राजकुमार भगत यांनी आपल्या भाषणात यूजीसी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी केली 15 जानेवारी 2026 UGC कायदा केंद्र सरकार नी लागू केला. त्या कायद्या विरोधात काही मूठ भर लोकांनी आंदोलन केले आणि सुप्रीम कोर्टाने त्या कायद्याला स्थगिती दिली. विद्यार्थ्यांच्या हक्का साठी आजाद समाज पार्टी कां जोपर्यंत कायदा लागू होणार नाही तो पर्यंत आम्ही शांत बसणार नाही व आंदोलन संविधानाच्या चौकटीत राहून करण्यात येत असल्याचे स्पष्ट केले. आंदोलनादरम्यान यूजीसी कायद्याची अंमलबजावणी झालीच पाहिजेत.. शिक्षणावर वार चालणार नाही, यूजीसी कायदा लागू करा, "शिक्षण वाचवा – यूजीसी मजबूत करा" अशा घोषणांनी परिसर दुमदुमला. त्यानंतर मा. राष्ट्रपती महोदया यांना मा. उपविभागीय अधिकारी, पुसद जिल्हा यवतमाळ यांच्या मार्फत निवेदन सादर करण्यात आले. सदर आंदोलन शांततापूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात पार पडले. यावेळी अशोक भालेराव, राजकुमार भगत, विशाल डाके, राहुल धुळे, प्रशिक कांबळे, शांतिशील जाधव, वैभव सूर्यवंशी, शुभम ढोले, त्रिशूल रावल, आकाश चवरे, अनिल कांबळे, अजय लोखंडे, राजू गायकवाड, वैभव खरतडे, स्वयम इंगळे, संदेश रणवीर, आकाश साळवे उपस्थित होते.

## मधापुरीत बनावट सह्यांचा प्रकार?

### सरकारी शिवण मशीन योजनेत लाभासाठी फसवणुकीचा प्रयत्न; पोलीस ठाण्यात तक्रार

**▸विदर्भ केसरी। तालुका प्र.**




मूर्तिजापूर : तालुक्यातील आदर्श ग्रामपंचायत मधापुरी येथे शासकीय योजनेचा लाभ मिळवण्यासाठी बनावट सह्या केल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या प्रकरणी मधापुरी येथील ग्रामपंचायत स्तरावर गैरप्रकार झाल्याची तक्रार मूर्तिजापूर शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली असून संबंधितांवर फौजदारी गुन्हा नोंदवण्याची मागणी सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांनी केलेल्या तक्रारीत करण्यात आली आहे. तक्रारीनुसार, मधापुरी येथील अंगणवाडी सेविका अन्नपूर्णा वासनिक यांनी सरपंच व ग्रामसेवक यांच्या खोट्या सह्या करून शासकीय योजनेचा लाभ मिळवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. दिनांक ११ सप्टेंबर २०२४ रोजी पंचायत समिती मूर्तिजापूर येथे सादर करण्यात आलेल्या अर्जाच्या अनुषंगाने हा प्रकार उघडकीस आल्याचे सांगितले जाते. तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, ग्रामपंचायत मधापुरी अंतर्गत अंगणवाडी सेविका व इतर संबंधितांच्या नावांचा वापर करून शिवण मशीन योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्रत्यक्षात लाभार्थी पात्र नसताना कागदपत्रांमध्ये फेरफार करून योजना मिळवण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप आहे. या प्रकारामुळे ग्रामपंचायत प्रशासनाची दिशाभूल करून शासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न झाल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. तक्रारदारांनी पोलिस प्रशासनाकडे सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून, सरकारी योजनांमधील गैरप्रकारांवर कठोर नियंत्रण ठेवण्याची मागणी जोर धरत आहे. पारदर्शकता आणि जबाबदारीची अपेक्षा व्यक्त करत नागरिकांनी दोषींवर कठोर कारवाई करण्याची भूमिका घेतली आहे. आता पोलिस तपासात नेमके सत्य काय समोर येते आणि प्रशासन कोणती कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पंचायत समिती मध्ये घरकुल योजना संदर्भात शिबिराचे आयोजन

**▸विदर्भ केसरी।राजकुमार चिंचोळकर**



बाळापूर : तालुक्यातील घरकुल योजनेच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी पंचायत समिती कार्यालयात शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. गटविकास अधिकारी नाना पजई यांच्या आदेशाने घरकुल लाभार्थ्यांच्या मंजुरी तसेच घरकुल अनुदान सह इतर अनेक अडचणी समस्या सोडविण्यासाठी आयोजित शिबिरा मध्ये जवळपास १८० पेक्षा अधिक लाभार्थ्यांचे अडचणी सोडविण्यात आल्या.बाळापुर पंचायत समिती अंतर्गत घरकुल लाभार्थ्यांची भरपुर कामे प्रलंबीत होती.त्या अनुषंगाने ग्रामपंचायत मधील ज्या लाभार्थ्यांचे घरकुल अद्याप पर्यंत मंजूर झालेले नाहीत किंवा त्यांच्या पेमेंट मध्ये अडचण येत आहे अशा लाभार्थ्यांना त्यांच्या (आधार कार्ड, जॉब कार्ड, बँक पासबुक) कागदपत्रासह दिनांक 17/02/2026 मंगळवार रोजी छत्रपती शिवाजी महाराज सभागृह* पंचायत समिती बाळापूर येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी मोठ्या प्रमाणावर लाभार्थी सहभागी झाले होते.तसेच यापुढे दरमहा महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी कॅम्पचे आयोजन करण्यात येनार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे या बाबतीत ग्रामपंचायतचे विदयमान सरपंच यांना कॅम्पबाबत अवगत करावे असे आदेश काढण्यात आले होते. उपरोक्त कॅम्पला विविध ग्राम पंचायत चे अडचणी असलेल्या घरकुलांचे लाभार्थी कागदपत्रासह उपस्थित होते.

विशेष म्हणजे गट विकास अधिकारी बंडू नाना पजई पंचायत समिती बाळापूर ह्यांची पूर्णवेळ उपस्थिती होती. तसेच विस्तार अधिकारी सांख्यिकी संदीप आगळे सर विस्तार अधिकारी पुरुषोत्तम नाकट स्थापत्य अभियंता:- कुमारी साक्षी इंगळे . पवन पाटील तसेच वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश महासचिव राजेंद्र पातोडे . निखिल गव्हाणकर .शशीपाल हरणे. कोमल आगरकर. नयना नेमाडे. ह्यांचे सोबत राजकुमार दामोदर, रामकृष्ण सोनटक्के,निरंजन शिरसाठ, निलेश इंगळे, सुगत डोंगरे,धर्मेंद्र दंदि,विजय पातोडे,अमोल वसंत वानखडे,निशीकांत सरदार,जय तायडे, सुरज दामोदर,सचिन शिराळे,शुभम नाईक,नागेश उमाळे,आकाश जंजाळ, आनंदा पातोडे,अशोक पातोडे,संदीप दामोदर,अजय बाबर,लखन चव्हाण,राहुल अंभोरे, राजदर खान ,गोपाल भाकरे,सचिन खंडारे,भगवान पाटोंड,विद्या पातोडे, युवराज डोंगरे,शिरू पाटील आखरे,हर्षल लोखंडे, आदि प्रामुख्याने उपस्थित असल्याचे कळविण्यात आले आहे.

■ **घरकुल योजना लाभार्थ्यांच्या अडिअडचणी सोडविण्यासाठी पंचायत समिती चे वतीने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये बहुतांश घरकुल लाभार्थ्यांच्या अडिअडचणी तात्काळ सोडविण्यात आल्या आहेत. तसेच दर महिन्यांसाठी पंचायत समितीमध्ये शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे.**
**-नाना पजई**
**गटविकास अधिकारी पंचायत समिती बाळापूर.**

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू | TODAY

चंद्रपूर

GOOD MORNING

## इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या पुरस्काराकरीता अर्ज करा

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : शासन निर्णयान्वये विभागांतर्गत स्थापित महात्मा बसवेश्वर सामाजिक समता-शिवा पुरस्कार, नटराज पुरस्कार, विश्वकर्मा पुरस्कार व क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कार. सदर पुरस्काराकरीता वीरशैव - लिंगायत समाजासाठी सामाजिक, कलात्मक, समाज संघटनात्मक आध्यात्मिक प्रबोधन व साहित्यिक क्षेत्रात काम करीत असलेल्या व्यक्तिच्या व संस्थांच्या कामाची दाद / दखल घ्यावी व इतरांना त्यापासून प्रेरणा मिळावी, जेणेकरुन या समाजातील समाजसेवक, कलावंत, समाज संघटनात्मक कार्यकर्ते, आध्यात्मिक प्रबोधनकार व साहित्यिक सरसावून पुढे यावेत याकरीता व्यक्तीसाठी व संस्थेसाठी पुरस्कार देण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने सदर पुरस्कार सन 2025-26 साठी देण्याकरीता गडचिरोली जिल्ह्यातील इच्छुक व्यक्ती व संस्था यांनी रितसर अर्ज उपरोक्त पुरस्कारासाठी संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक, इतर मागास बहुजन कल्याण गडचिरोली या कार्यालयात कार्यालयीन वेळेस दिनांक 27.02.2026 रोजी पूर्वी अर्ज सादर करण्यात यावेत. अर्जाचा नमुना प्रत कार्यालयातून प्राप्त करुन घ्यावे व अधिक माहितीसाठी या कार्यालयात प्रत्यक्ष संपर्क साधावा असे आवाहन डॉ. सचिन मडावी, सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण गडचिरोली यांनी केले आहे.

# अंजनगावात जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रमात गोंधळ

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रेम तायडे**

अमरावती जिल्ह्यातील सर्व तालुकास्तरावर जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याच अनुषंगाने अंजनगाव सुर्जी येथे तहसील कार्यालयात जनसंवाद कार्यक्रम पार पडला. मात्र या कार्यक्रमात नागरिकांच्या प्रलंबित तक्रारींवर ठोस उत्तरे न मिळाल्याने गोंधळ निर्माण झाला. नागरिकांच्या अनेक तक्रारी शासकीय पातळीवर प्रलंबित असताना, या कार्यक्रमाच्या माध्यमातून न्याय मिळेल या अपेक्षेने मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

मात्र प्रत्यक्षात पंचायत समिती स्तरावरील तक्रारींचे प्रमाण अधिक असतानाही संबंधित अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत. कार्यक्रमाचे उद्घाटन करून आमदार गजानन लवटे निघून गेल्याने नागरिकांमध्ये असंतोष वाढला. मंचावर नगर परिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांनी कर्मचाऱ्यांना धारेवर धरत तक्रारींबाबत जाब विचारला. तरीही नागरिकांचे प्रश्न मार्गी न लागल्याने कार्यक्रमात गोंधळ उडाला. परिणामी मंचावरील काही अधिकारी टप्प्याटप्प्याने निघून गेले. या वेळी तहसीलदार सौ. पुष्पा सोळंके-धाबेराव यांनी परिस्थिती सांभाळण्याचा प्रयत्न करत नागरिकांना समजावून सांगितले. मात्र बहुतांश समस्या पंचायत समिती स्तरावर असल्याने नागरिकांचे समाधान झाले नाही. प्रभारी गटविकास अधिकारी सौ. कल्पना जायभाय नागरिकांच्या प्रश्नांना ठोस उत्तरे देऊ शकल्या नाहीत. कार्यक्रमाला विभागीय दंडाधिकारी राजेश्वर हांडे, ठाणेदार सुरज बोंडे, जिल्हा परिषद सहाय्यक अधिकारी सुनील गवई, तालुका कृषी अधिकारी कुमारी भारती जाधव, महसूल व गटशिक्षण अधिकारी, नगर परिषद मुख्याधिकारी, पाणीपुरवठा अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, पटवारी, ग्रामसेवक, विद्युत मंडळ व पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. सामाजिक वनीकरण विभागाचे कर्मचारी मात्र उपस्थित राहू शकले नाहीत. कार्यक्रमाच्या शेवटी गटविकास अधिकाऱ्यांनी दोन दिवसांत तक्रारींचा निपटारा करण्याचे आश्वासन दिले. मात्र त्यानंतरही गोंधळ वाढत कार्यक्रमाचा समारोप झाला. या कार्यक्रमासाठी झालेला शासकीय खर्च व वेळ वाया गेल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. आमदार व खासदार अनुपस्थित असल्याने आपली व्यथा कुणापुढे मांडावी, असा प्रश्न नागरिकांच्या मनात निर्माण झाला असून, याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.



## संक्षीप्त



### एटापल्लीच्या नगरसेवकांनी वाचला खासदार किरसान यांचेकडे समस्यांचा पाढा..!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

एटापल्ली :- गडचिरोली जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलेल्या खासदार डॉ. नामदेव किरसान यांची एटापल्ली नगरपंचायतच्या नगरसेवकांनी भेट घेऊन तालुक्याच्या विविध समस्या सोडविण्याची आणि नगरपंचायत प्रशासनातील अनागोंदी कारभाराच्या चौकशीची मागणी करण्यात आली आहे. एटापल्ली तालुका हा आदिवासी बहुल व मागास असून देश स्वातंत्र्याच्या पंचांहात्तर वर्षानंतरही शासनाकडून पन्नास ते साठ गाव खेड्यांना जोडणारे रस्ते निर्माण करण्यात आले नाहीत, मुख्य रस्त्याची दुरावस्था झाल्याचे निदर्शन नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने खासदार किरसान यांच्या भेटी दरम्यान नोंदविले आहे. यावेळी नगरपंचायत मुख्याधिकारी प्रणय तांबे यांच्या मनमानी व अनागोंदी कारभार केल्या जात असल्याची तक्रार खासदार किरसान यांच्याकडे नगरसेवक मनोहर बोरकर, निजान पेंदाम, किसन हिचामी, व काँग्रेस कार्यकर्त्यांनी केली आहे. आरोग्य, शिक्षण, पिण्याचे शुद्ध पाणी नागरी वस्त्यांमध्ये मूलभूत व भौतिक सोयीसुविधांची निर्मिती मागणीही यावेळी करण्यात आली आहे. अशा विविध समस्यांवर नगरसेवक मनोहर बोरकर, निजान पेंदाम, किसन हिचामी, शहर काँग्रेस अध्यक्ष सतीश मुप्पलवार व राकेश समुद्रालवार यांनी केली आहे. शिष्टमंडळाशी बोलतांना खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी समस्यांचा पाठपुरावा शासन दरबारीं करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. यावेळी आमदार रामदास मसराम, काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याहस्ते क्षयरुग्णांना फुड बॉस्केटचे वितरण

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियानाच्या माध्यमातून क्षयरुग्णांना औषधोपचारासोबतच प्रथिनयुक्त पोषण आहार मिळावा या उद्देशाने गडचिरोली जिल्ह्यात व्यापक जनसहभागातून उल्लेखनीय कार्य होत आहे. या अभियानांतर्गत राज्याचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते जिल्हा परिषद सभागृहात प्रतीकात्मक स्वरूपात 5 क्षयरुग्णांना फुड बॉस्केटचे वितरण करण्यात आले. दि. 9 सप्टेंबर 2022 रोजी राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियानाचे उद्घाटन करण्यात आले होते. या अभियानाचा मुख्य हेतू म्हणजे क्षयरुग्णांना उपचार काळात पोषणयुक्त आहाराची उपलब्धता करून देणे हा आहे. समाजातील दानशूर व्यक्ती, समाजकार्यकर्ते, उद्योजक आदींनी 'निक्षय मित्र' म्हणून पुढाकार घेत क्षयरुग्णांना दत्तक घेऊन उपचार पूर्ण होईपर्यंत कोरडा पोषण आहार पुरवावा, असे या उपक्रमाचे स्वरूप आहे. गडचिरोली जिल्ह्यात या अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत 69 निक्षय मित्रांकडून एकूण 302 क्षयरुग्णांना फुड बॉस्केटचे वितरण करण्यात आले आहे. यामध्ये नियमितपणे पोषण आहार किट उपलब्ध करून देण्यात येत असून, त्यामुळे रुग्णांच्या आरोग्य पुनर्प्राप्तीस मोठी मदत होत आहे. यावेळी मंत्री आबिटकर यांनी जास्तीत जास्त नागरिकांनी 'निक्षय मित्र' बनून या अभियानात सहभागी व्हावे, अधिकाधिक क्षयरुग्णांना दत्तक घ्यावे व त्यांना पोषण आहार किट प्रदान करून टीबी मुक्त भारताच्या संकल्पनेला बळ द्यावे, असे आवाहन केले.

### एकलव्य निवासी शाळा प्रवेशपूर्व परीक्षा 1 मार्च रोजी

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली अंतर्गत सन 2026-27 या शैक्षणिक वर्षात एकलव्य निवासी शाळामध्ये इयत्ता 6 वी चे वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या व इयत्ता 7 वी ते 9 वीच्या वर्गातील विद्यार्थी अनुशेष भरुन काढण्याची शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, जिल्हा परीषद, नगरपालिका, महानगरपालिका व इतर शासनमान्यता प्राप्त प्राथमिक व माध्यमिक शाळेतील अनुसूचित / आदिम जमातीच्या विद्यार्थ्याकरीता स्पर्धा परीक्षेचे आयोजन रविवार, दिनांक 1 मार्च 2026 रोजी इयत्ता 6 वी करीता सकाळी 11.00 ते 13.00 या वेळात तसेच इयत्ता 7 वी ते 9 वीच्या विद्यार्थ्यांकरीता सकाळी 11.00 ते 14.00 या वेळेत करण्यात आले आहे. इयत्ता 6 वी ते 9 वीच्या वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकडून ऑफलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले होते. सदरची यादी परीक्षा केंद्रनिहाय लावण्यात आलेली आहे. प्रवेशपूर्व परीक्षा गडचिरोली, धानोरा, चामोर्शी, आरमोरी या तालुक्यातील शाळांसाठी एकलव्य निवासी शाळा चामोर्शी (सद्यास्थित- शासकीय इंग्रजी माध्यम आश्रमशाळा, गडचिरोली), येथे तसेच वडसा, कुरखेडा, कोरची या तालुक्यातील शाळांसाठी एकलव्य निवासी शाळा कोरची (सद्यास्थित- शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, कोरची), या परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर सकाळी 9 वाजता हजर राहावे. विद्यार्थ्यांनी आधार कार्ड किंवा ओळखपत्र सोबत आणावे विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर सुरक्षितपणे आणण्याची जबाबदारी संबंधित आश्रमशाळा, जि.प. अनुदानित व इतर शाळांच्या मुख्याधापक/शिक्षकांची आहे. परीक्षा केंद्रावर सर्व विद्यार्थ्यांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी अरुण एम. यांनी केले आहे.

### गडचिरोलीत भाजपाचा आक्रमक निषेध आंदोलन

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : भारतीय जनता पार्टी शहर व जिल्हा यांच्या वतीने काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या कथित वादग्रस्त वक्तव्याच्या निषेधार्थ आज गडचिरोली शहरातील इंदिरा गांधी चौक येथे आक्रमक आंदोलन छेडण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व भाजपा जिल्हाध्यक्ष रमेश बारसागडे यांनी केले. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची तुलना टिपू सुलतान यांच्यासोबत करण्यात आल्याच्या वक्तव्यामुळे राज्यभरात संतापाची लाट उसळली असून, गडचिरोलीतही भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला. "छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत असून त्यांच्या कार्याची व इतिहासाची तुलना करणे हे जनतेच्या भावना दुखावणारे आहे," असे मत आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केले. आंदोलनादरम्यान घोषणाबाजी करत संबंधित वक्तव्याचा जाहीर निषेध करण्यात आला. जिल्हाध्यक्ष रमेश बारसागडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "इतिहासातील महान व्यक्तिमत्त्वांविषयी बोलताना राजकीय स्वार्थ बाजूला ठेवून जबाबदारीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. अन्यथा जनतेच्या भावनांचा उद्रेक होणे स्वाभाविक आहे." या आंदोलनात माजी खासदार अशोक नेते, नगराध्यक्ष अँड. प्रणोती सागर निबोंरकर, उपनगराध्यक्ष निखील चरडे, जिल्हा समन्वयक प्रमोद पिपरे, जिल्हा महामंत्री गोविंद सारडा, शहराध्यक्ष तथा न.प. बांधकाम सभापती अनिल कुनघाडकर, सभापती मुक्तेश्वर काटवे, सभापती हर्षल गेडाम, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष तथा नगरसेविका योगिता पिपरे, नगरसेवक सागर निबोंरकर, नगरसेवक शेखर आखाडे, नगरसेविका वर्षा शेडमाके, नगरसेविका साक्षी बोलूवार यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाघाचा रेट्याखेडा शेत शिवारात शेतकर्यांवर हल्ला, प्रकृती गंभीर

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रेमदास तायडे**

मेळघाट : चिखलदरा तालुक्यातील सेमाडोह उत्तर भागात जंगला कडे असलेल्या, रेट्याखेडा गावातील श्री मुन्ना झापु,जामुनकर वय 39 या रेटयाखेडा हे गावा शेजारी शेतात संध्याकाळी च्या सुमारास काम करत असताना अचानक वाघाने त्यांच्यावर हल्ला चढविला त्यांनी वाघा सोबत प्रतिकार करून आपला जीव वाचविला आरडाओरडा वाघाच्या तावडीतून त्यांची सुटका केली वाघाच्या हल्ल्यात की गंभीर दुखापत झाल्याने त्यांना जवळच्या रुग्णालयात रक्त पाबळ अवस्थेत दाखल करण्यात आली होते प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना अमरावती जिल्हा सामान्य शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले आहे मेलघाट मध्ये पट्टेदार वाघाची दहशत निर्माण झाली आहे त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याचेही त्यांच्या भावाने सांगितले घटनास्थळाला स्थानिक फॉरेस्ट विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेट दिली आहे काही फॉरेस्ट कर्मचारी वाघाचा शोध घेत आहे तर काही कर्मचारी



वनरक्षक हल्ल्यात जखमी झालेल्या जामुनकर यांच्या चौकशी करताना रुग्णालयात असल्याचेही समजले वाघाच्या हल्ल्या भीमसेन दिवस वाट होत असल्याचे बोलले जात आहे टायगर फॉरेस्ट विभागाकडून विशेष दखल घेऊन जखमी झालेल्या इसमाला तत्काळ मदत द्यावी अशी मागणी आदिवासी समाजा कडून होत आहे

## जिल्ह्यात 20 फेब्रुवारी ते 6 मार्चपर्यंत जमावबंदी

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१)(३) अन्वये दिनांक २० फेब्रुवारी २०२६ रोजी पासून ते ६ मार्च २०२६ रोजी पर्यंत संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यात जमावबंदी आदेश लागू केला आहे. सध्या सुरू असलेल्या इयत्ता १२ वीच्या परीक्षा, २० फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या इयत्ता १० वीच्या परीक्षा, तसेच होळी, धुलिवंदन आणि शिवजयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय माओवादी संघटनेकडून टि.सी.ओ.सी. कालावधीत संभाव्य हिंसक कारवायांची शक्यता लक्षात घेता प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून आदेश जारी करण्यात आला आहे. या कालावधीत शस्त्र, दाहक किंवा स्फोटक पदार्थ बाळगणे, दगडफेक साहित्य जमा करणे, आवेशपूर्ण व उत्तेजक भाषणे देणे, तसेच संबंधित प्राधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी शिवाय मिरवणूक, सभा किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींची सार्वजनिक ठिकाणी जमावबंदी करण्यास मनाई करण्यात आली आहे.

## महिला आयोग आपल्या दारी' शुक्रवारी गडचिरोली जिल्ह्यात महिलांनी पुढाकार घेत तक्रारी मांडाव्या

### 'महिला आयोग आपल्या दारी' कार्यक्रमांतर्गत रुपाली चाकणकर यांचे आवाहन

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडून 'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत जिल्ह्यात शुक्रवार दि. २० फेब्रुवारी, २०२६ रोजी जनसुनावणी आयोजित करण्यात आली असून, आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती रुपाली चाकणकर तक्रारींची सुनावणी घेणार आहेत. नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली येथे सकाळी ११ वाजता होणाऱ्या जनसुनावणीस महिलांनी पुढे येऊन न घाबरता आपल्या तक्रारी मांडाव्यात, असे आवाहन श्रीमती रुपाली चाकणकर यांनी केले आहे. महिलांना त्यांच्या जिल्हयाच्या ठिकाणी न्याय मिळावा यासाठी आयोगाकडून 'महिला आयोग आपल्या दारी' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या



अध्यक्षा श्रीमती रुपाली चाकणकर दि. २० फेब्रुवारी, २०२६ रोजी गडचिरोली जिल्हयात असणार आहेत. यावेळी जिल्हास्तरावरील जनसुनावणी घेत महिलांच्या तक्रारीचे निवारण करण्याचा प्रयत्न आहे. जनसुनावणी नंतर जिल्ह्यातील महिला व बालकांच्या प्रश्नांच्या अनुषंगाने प्रशासन, पोलीस, कामगार, परिवहन, आरोग्य, शिक्षण आदी विभागांची आढावा बैठक घेण्यात येणार आहे. 'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमाबाबत आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती चाकणकर म्हणाल्या, 'महाराष्ट्र राज्य महिला आयोग महिलांच्या सक्षमीकरणासाठी अविरत कार्यरत आहे. राज्याच्या कानाकोपर्यातील महिलांना मुंबई कार्यालयात येऊन तक्रार करणे, सुनावणीसाठी प्रत्यक्ष उपस्थित राहणे, आर्थिकदृष्ट्या तसेच इतर कारणांमुळे शक्य होत नाही. त्यामुळे आयोग जिल्हास्तरावर सर्व यंत्रणेनिशी जात आहे. महिला आयोग आपल्या दारी अंतर्गत जनसुनावणीला पोलिस, प्रशासन, विधी सल्लागार, समुपदेशक, जिल्हा समन्वयक आदी उपस्थित असल्याने तक्रारीवर त्याच ठिकाणी कार्यवाही करण्यात येते. यातून आपली कैफियत मांडणा-या महिलांना त्वरित दिलासा देण्याच काम आयोग करत आहे. आढावा बैठकीतून वरिष्ठ अधिकार्याना त्या जिल्ह्यातील महिलांचे प्रश्न, योजनांची अंमलबजावणी निर्देश देण्यात येतात.

## ध्वनीक्षेपक वापरास १५ दिवसांची सशर्त सुट जाहीर

### विविध सण-उत्सवांसाठी सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत परवानगी

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : केंद्र शासनाच्या ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) सुधारित नियम, २०१७ च्या नियम ५ उपनियम (३) अन्वये राज्य शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना वर्षातून १५ दिवस ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक वापरास सशर्त सुट जाहिर करण्याचे अधिकार प्रदान केले आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अविश्यांत पंडा यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक श्री निलोत्पल यांच्याशी सल्लामसलत करून सन २०२६ या वर्षाकरिता ठरावीक १५ दिवस सकाळी ०६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक वापरण्यास परवानगी जाहीर केली आहे. रात्री १२.०० वाजेपर्यंत ध्वनीवर्धक वापरण्यास निश्चित करण्यात आलेले दिवस पुढीलप्रमाणे आहेत : शिवजयंती (१९ फेब्रुवारी २०२६), डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती (१४ एप्रिल २०२६), ईद-ए-मिलाद (२६ ऑगस्ट २०२६), गणेश उत्सवासाठी चार दिवस (२०, २३, २४ व २५ सप्टेंबर २०२६), नवरात्र उत्सवासाठी चार दिवस (१९, २०, २१ व २२ ऑक्टोबर २०२६), दिवाळी लक्ष्मीपूजन (८ नोव्हेंबर २०२६), ख्रिसमस (२५ डिसेंबर २०२६) तसेच ३१ डिसेंबर २०२६ अशा एकूण १५ दिवसांचा समावेश आहे. ही सुट श्रोत्यगृहे, सभागृहे, सामूहिक सभागृहे व मेजवानी कक्ष यांसारख्या बंद जागांव्यतिरिक्त इतर ठिकाणी लागू राहील. मात्र, केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम २००० तसेच सुधारित नियम २०१७ मधील तरतुदींचे काटेकोर पालन करणे बंधनकारक राहील. जनहित याचिका क्र. १७३/२०१० मध्ये मा. उच्च न्यायालयाने १६ ऑगस्ट २०१६ रोजी दिलेल्या आदेशांचे पालन करणे आवश्यक राहील. जाहीर केलेल्या अधिसूचनेनुसार निश्चित ध्वनी मर्यादा व अटींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता संबंधित आयोजक व विभागांनी घ्यावी. राज्य शासनाने घोषित केलेल्या शांतता क्षेत्रात ही सवलत लागू राहणार नाही, असेही जिल्हादंडाधिकारी यांच्या आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

## पिता-पुत्राला टोळक्याकडून तीक्ष्ण शस्त्राने मारहाण

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

पुणे शहरात लष्कर भागात एका टोळक्याने पिता-पुत्राला तीक्ष्ण शस्त्राने मारहाण केल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात दोघेही गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी या प्रकरणी एका आरोपीला अटक केली असून, त्याच्या साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अथर्व अमोल बिल्लमपल्ली (वय २४, रा. कामाठीपुरा, लष्कर) आणि त्याचे वडील अमोल हे फराळ वाटप कार्यक्रमानंतर रिक्षातून केटरिंग व्यावसायिकाकडून घेतलेले टेबल परत देण्यासाठी निघाले होते. त्याचवेळी आरोपी अल्हान साजीद खान आणि त्याचे साथीदार दुचाकीवरून जात होते. दुचाकी पुढे नेण्यावरून त्यांच्यात किरकोळ वाद झाला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. आरोपी खान आणि त्याच्या साथीदारांनी रिक्षा अडवून बिल्लमपल्ली पिता-पुत्राला मारहाण केली. त्यांनी तीक्ष्ण शस्त्राने वारही केले, ज्यामुळे दोघेही जखमी झाले. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.

## मृतांच्या नावावर पोटहिस्सा ; वाळूमाफियांना प्रशासनाचा 'आशीर्वाद'?

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी फुलचंद वाघाडे**

वडसा : आरमोरी तालुक्यातील मौजा करपाडा चक येथील सर्व्हे क्र. १५७ प्रकरणात वाळू उत्खननासाठी नियमांची उघडपणे पायमल्ली झाल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. उपविभागीय अधिकारी, देसाईगंज यांच्या कार्यालयासमोर गेल्या चार दिवसांपासून सूरज हजारे यांचे सुरू असलेले बेमुदत ठिय्या आंदोलन आता अधिक तीव्र झाले असून, संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाईची मागणी आंदोलनकर्त्यांनी लावून धरली आहे. आंदोलनकर्त्यांच्या आरोपांनुसार, सर्व्हे क्र. १५७ चा पोटहिस्सा सहधारक उपस्थित नसताना, केवळ वाळू उत्खननाचा मार्ग मोकळा करण्यासाठी करण्यात आला. विशेष म्हणजे, मृत व्यक्तींच्या नावावर वेगळा पोटहिस्सा दाखवण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. भूमि अभिलेख कार्यालयातील काही अधिकाऱ्यांना हाताशी धरून वाळूमाफियांनी हा प्रकार रचल्याचा थेट आरोप करण्यात येत आहे. मोजणीदरम्यान पंचनाम्यात स्पष्ट नोंद असताना की सातबाऱ्यातील सहधारक "तुकाराम मारोती" हजर नव्हते, तरीसुद्धा पोटहिस्सा करण्यात आला. हा प्रकार केवळ प्रशासकीय दुर्लक्ष नसून, संगनमताचा भाग असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. अशा स्पष्ट विसंगती असूनही उपविभागीय अधिकारी कार्यालयाने प्राथमिक अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे सादर केल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यापुढे आणखी एक विसंगती उघड झाली आहे. मोका स्थळ पाहणी अहवालात संपूर्ण क्षेत्रात भुईमूग पिकाचे अस्तित्व नमूद केलेले असताना, प्रत्यक्षात त्या क्षेत्रातून वाळू उत्खननाचा प्रयत्न झाल्याचा आरोप आहे. शेती पीक असल्याचे नोंदवूनही वाळू उत्खननास पोषक असा अहवाल सादर करणे, हे प्रशासनाच्या भूमिकेबाबत गंभीर शंका उपस्थित करणारे आहे. आंदोलनकर्त्यांचा आरोप आहे की, चौकशी करण्याऐवजी संबंधित अधिकाऱ्यांनी वाळूमाफियांना मूक सहकार्य केले आहे. त्यामुळे "प्रशासन कोणाच्या बाजूने?" असा संतप्त सवाल जनतेतून उपस्थित होत आहे. दरम्यान, आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट




इशारा दिला आहे की, दोषींवर गुन्हे दाखल करून निष्पक्ष चौकशीची घोषणा झाली नाही, तर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल. करपाडा चक येथील सर्व्हे क्र. १५७ प्रकरण आता केवळ जमीन मोजणीचा मुद्दा राहिला नसून, प्रशासनातील पारदर्शकतेवरच प्रश्न उपस्थित करणारा ठरला आहे. वाळूमाफियांच्या फायद्यासाठी नियम वाकवले जात असतील, तर त्याची जबाबदारी निश्चित होणार का, हा प्रश्न आता जिल्हा प्रशासनासमोर उभा ठाकला आहे.

दैनिक विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
TODAY
गडचिरोली
GOOD MORNING

## मरपल्ली येथे क्रिकेट क्लबचे उद्घाटन उत्साहात

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

अहेरी : अहेरी तालुका अंतर्गत येत असलेल्या मौजा - मरपल्ली येथे नव्याने स्थापन करण्यात आलेल्या भव्य क्रिकेट क्लबचे उद्घाटन युवा नेते हर्षवर्धन बाबा आत्राम यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. गावातील युवकांना क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांच्या अंगी असलेली प्रतिभा विकसित व्हावी या उद्देशाने क्रिकेट क्लबची स्थापना करण्यात आली आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अरुण मुक्कावार होते. यावेळी रतन दुर्गे सर, अरुण वेलादी (सरपंच, मरपल्ली), श्रीनिवास गावडे, बानय्या कुमरे, व्यंकटी कोंडागुर्ले, चंदू दुर्गे, आसुमती कोंडागुर्ले, ललिता पेटगू, बापू मेटकी तसेच आकाश शिंदे (पोलीस केंद्र, मरपल्ली) आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रावण कोंडागुर्ले यांनी केले. अध्यक्ष प्रसंगी अरुण मुक्कावार यांनी युवकांनी खेळाला प्राधान्य देत शिस्त, संघभावना आणि मेहनतीच्या जोरावर यश संपादन करावे, असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



## संक्षीप्त



### चितळाची शिकार प्रकरणी चौघांना अटक ; मांस व कातडे जप्त...!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

चामोर्शी : वन्यप्राण्यांची बेकायदेशीर शिकार करणाऱ्यांवर वनविभागाने मोठी कारवाई करत रेखेगाव जंगल परिसरातून चितळाची शिकार केल्याप्रकरणी चौघांना अटक केली. सदर कारवाई नुकतीच भाडभिडी उपवन क्षेत्रात करण्यात आली. चामोर्शी वनपरिक्षेत्रांतर्गत भाडभिडी उपवन क्षेत्रातील रेखेगाव जंगल परिसरात शिकार होत असल्याची गुप्त माहिती वनविभागाला मिळाल्यानंतर सापळा रचण्यात आला. कारवाई दरम्यान घटनास्थळी पस्थित असलेले राजीव कांदो, वैभव तिमा, नरथ कोवासे व संतोष हेडा (सर्व रा. रेखेगाव) यांना ताब्यात घेण्यात आले. धाडीत आरोपींकडून तब्बल 11.400 किलो वजनाचे चितळाचे मांस तसेच कातडे जप्त करण्यात आले. यावरून वन्यजीवांची शिकार करुन त्यांची विक्री करण्याचा प्रयत्न होत असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. सदर शिकार प्रकरणी आरोपींविरुद्ध वन्यजीव संरक्षण अधिनियम 1972 अंतर्गत गुन्हा नोंदवून अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरु आहे. वन्यजीवांची अवैध शिकार रोखण्यासाठी वनविभाग सतर्क असून अशा प्रकारच्या गुन्ह्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही वनविभागाने दिला आहे.




### जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली येथे खनिज प्रतिष्ठानची बैठक नुकतीच पार पडली

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज : जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली येते जिल्हा खनीज प्रतिष्ठानची बैठक गडचिरोली -चिमूर लोकसभा क्षेत्राचे लोकप्रिय खासदार डॉ. नामदेव किरसान यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी या बैठकीत अहेरी विधानसभा क्षेत्राचे आमदार धर्मरावबाबा आत्राम, आरमोरी विधानसभा क्षेत्राचे आमदार रामदास मसराम, गडचिरोली विधानसभा क्षेत्राचे आमदार डॉक्टर मिलिंद नरोटे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे, जिल्हा खनीकर्म अधिकारी इम्रान शेख सह विविध विभागाचे अधिकारी, समितीतील सदस्य यावेळी उपस्थित होते. जिल्ह्यातील खान बाधित क्षेत्रातील पायाभूत सुविधा निर्माण करणे तसेच खान प्रभावीत क्षेत्रातील नागरिकांच्या सर्वांगीण विकासाच्या अनुषंगाने आवश्यक प्रस्ताव व प्रकल्पांना मंजुरी देण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.





### ग्रामीण भागातील युवकांनी खेळाच्या माध्यमातून एकत्रित यावे व गावाचा विकास करावा - डॉ. प्रणय खुणे प्रदेशाध्यक्ष राष्ट्रीय मानवाधिकार संघटना

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

घोट /चामोर्शी :- दिनांक 17 फेब्रुवारी 2026 रोजी चामोर्शी तालुक्यातील घोट जवळील मक्केपल्ली चेक नंबर एक मौजा गोलबंद्री येथे जय शिवराय कबड्डी क्लब मक्केपल्ली यांच्या वतीने भव्य दिवसकालीन कबड्डी सामन्याचे व सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.या सोहळ्याचे उदघाट्न राष्ट्रीय मानवाधिकार संघटनेचे प्रदेश अध्यक्ष डॉ. प्रणय भाऊ खुणे यांनी केले, प्रमुख पाहुणे रमेश अधिकारी जिल्हा अध्यक्ष, राष्ट्रीय मानवाधिकार संघटना,जिल्हा उपाध्यक्ष नानु भाऊ उपाध्ये, संघटनेचे नेते प्रवीण गेडाम, भाजपा नेते गुरूदास पालकवार, संदीप पाटील भोवरे, विलास वडेट्टीवार, दिनेश मुजुमदार पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते उपस्थितांना डॉ. खुणे यांनी मार्गदर्शन केले व सांगितले युवकांनी खेळाच्या माध्यमातून एकत्रित येऊन गावाचा विकास कसा करता येईल यासाठी कटिबद्ध व्हावे असे सांगितले यावेळी मंडळाचे अध्यक्ष सुमित भट्टलवार उपाध्यक्ष सुशांत भट्टलवार सचिव तेजस निमगडे, सहसचिव स्वप्निल भट्टलवार कोषाध्यक्ष दक्ष तुम्पल्लीवार, कोषाध्यक्ष चेतन मेकर क्रीडा प्रमुख प्रकल्प आयोजक धनराज खोब्रागडे, मनोज मेश्राम व पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर भीषण अपघात

## दुचाकीस्वार विद्यार्थ्यांना स्कॉर्पिओची धडक, काचांचे बॅरिकेट फुटले, 25 हजारांचे नुकसान..!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**
**विनोद सेलोटे**

गडचिरोली : शहरातील पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर भरधाव चारचाकी वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने दुचाकीवरील दोन युवक जखमी झाल्याची घटना आज दुपारी सुमारे सव्वाचार वाजताच्या सुमारास घडली. या अपघातात पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उभारण्यात आलेल्या काचांच्या बॅरिकेटचे मोठे नुकसान झाले असून सुमारे 25 हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दुचाकीवरील दोन्ही युवक हे आयटीआय सेंटरमध्ये प्रशिक्षणाच्या कामानिमित्त आले होते. ते एमआयडीसी परिसराकडून पोलीस अधीक्षक






कार्यालयासमोरील मुख्य रस्त्याने जात असतांना जिल्हा परिषदेकडून भरधाव वेगाने येणाऱ्या स्कॉर्पिओ (क्रमांक MH 33 AC 9444) या चारचाकी वाहनाने अचानक बाजूच्या रस्त्याने येत दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेमुळे दुचाकीवरील दोन्ही युवक नियंत्रण गमावून थेट पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उभारण्यात आलेल्या काचांच्या बॅरिकेटवर जाऊन आदळले.

या धडकेत बॅरिकेटचे काच फुटून मोठे नुकसान झाले. अपघात इतका जोरदार होता की, परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनास्थळी उपस्थित असलेल्या प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, दुचाकीस्वार सरळ मार्गाने येत होते, मात्र बाजूच्या मार्गाने अचानक भरधाव वेगात आलेल्या स्कॉर्पिओने त्यांना धडक दिल्याने हा अपघात घडला. अपघातात जखमी झालेल्या दोन्ही युवकांना तात्काळ उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघाताची माहिती संबंधित पोलीस ठाण्यात देण्यात आली असून पुढील तपास सुरु आहे.

दरम्यान, पोलीस अधीक्षक कार्यालयासारख्या महत्त्वाच्या ठिकाणासमोरच अशा प्रकारे भरधाव वेगाने वाहने धावत असल्याबाबत नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. जर पोलीस अधीक्षक कार्यालयासमोरच वेगावर नियंत्रण राहत नसेल, तर शहरातील इतर भागात भरधाव वाहनांवर कसे नियंत्रण ठेवले जाणार, असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. या घटनेमुळे शहरातील वाहतूक नियंत्रण आणि वेग मर्यादेच्या अंमलबजावणी बाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून संबंधित विभागाने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तालुक्यात एका बसचा मोठा अपघात टळल्याची घटना समोर..!

### काळ आला होता पण,वेळ आली नव्हती म्हणून प्रवाशांचा वाचला जीव

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी :**
**विनोद सेलोटे**

सिरोंचा : गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तालुक्यात एका बसचा मोठा अपघात टळल्याची घटना समोर आली आहे. सुमारे 30 प्रवाशांना घेऊन जाणारी बस मोठ्या नाल्याच्या वळणावर उलटून अर्ध्यावरच लटकली. सुदैवाने बस थेट 6 फूट खोल पाण्यात कोसळली नाही.अन्यथा मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती.या घटनेमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून सर्वत्र चिंता व्यक्त केली जात आहे.

सिरोंचावरून रेगुंटाकडे जाणारी एसटी बस रात्रीच्या सुमारास कंबालपेटा नाला ते टेकडा परिसरात आली होती. या ठिकाणी पुलाचे काम सुरू असल्यामुळे वाहतुकीसाठी तात्पुरता कच्चा वळण मार्ग तयार करण्यात आला आहे. रात्री अंधारात या वळणावरून जात असतांना चालकाचा बसवरील ताबा सुटला आणि बस थेट नाल्याच्या कडेला



जाऊन एका बाजूला झुकली. बस नाल्यात पडणार अशी परिस्थिती निर्माण झाल्याने प्रवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला. बस एका बाजूला लटकलेली असतांना प्रवाशांनी प्रसंगावधान राखत खिडक्यांमधून आणि दरवाज्यातून बाहेर पडण्यास सुरुवात केली. काही प्रवाशांनी एकमेकांना मदत करत सुरक्षितपणे बाहेर काढले. नाल्यात सुमारे 6 फूट पाणी असल्याने बस पूर्णपणे उलटली असती तर मोठी जीवितहानी झाली असती, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. धक्कादायक बाब म्हणजे अपघातानंतर चालकाने प्रवाशांना मदत न करता स्वतः बसमधून उडी मारून घटनास्थळावरून पळ काढला.त्यामुळे प्रवाशांमध्ये संतापाची भावना आहे. रात्रीच्या वेळी परिसर निर्जन असल्याने मदत मिळण्यास उशीर झाला.स्थानिक नागरिकांनी पुलाचे काम संथ गतीने सुरू असल्याचा आणि कच्चा रस्ता धोकादायक असल्याचा आरोप केला आहे. प्रवाशांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर तसेच चालकावर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

## गॅस बिल भरण्याच्या नावाखाली फसवणूक

पुणे : पुण्यात सायबर चोरट्यांनी गॅस पुरवठा खंडित करण्याची धमकी देऊन दोन नागरिकांना तब्बल 16 लाख रुपयांचा गंडा घातला आहे. खराडी आणि विमाननगर परिसरात घडलेल्या या दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये एका ज्येष्ठ महिलेसह एका पुरुषाची फसवणूक झाली आहे. खराडी येथील एका 72 वर्षीय ज्येष्ठ महिलेची 11 लाख 94 हजार रुपयांची फसवणूक झाली आहे. 11 फेब्रुवारी रोजी सायबर चोरट्यांनी महिलेच्या मोबाईलवर संपर्क साधला. पाईपद्वारे गॅस पुरवठा करणाऱ्या कंपनीतून बोलत असल्याचे भासवून, थकीत गॅस देयक न भरल्यास पुरवठा खंडित करण्याची धमकी दिली.

## गडचिरोलीत मद्यनिर्मिती प्रकल्पाच्या जनसुनावणीवरून वाद : डॉ. अभय बंग, देवाजी तोफा यांचा विरोध

### सुनावणी रद्द करण्याचा आग्रह, दारूबंदी संघटनांचा तीव्र विरोध

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**
**: फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : तीन दशकांहून अधिक काळ दारूबंदी लागू असलेल्या गडचिरोली जिल्ह्यात पुन्हा एकदा मद्यनिर्मितीच्या प्रस्तावित प्रकल्पामुळे संघर्षाची ठिणगी पडली आहे.चामोर्शी येथील 'एलटीबी बेव्हरेजेस' या मोहफुलापासून मद्य व इथेनॉल निर्मिती करणाऱ्या प्रकल्पासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ९ मार्च २०२६ रोजी जनसुनावणी आयोजित केली आहे. मात्र, या सुनावणीला गडचिरोली जिल्हा दारूबंदी संघटनेने तीव्र आक्षेप घेतला असून, ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अभय बंग आणि ज्येष्ठ कार्यकर्ते देवाजी तोफा यांनी ही सुनावणी तात्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे. या संदर्भात मुख्यमंत्री, आरोग्य सचिव आणि जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून प्रशासकीय भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, १ फेब्रुवारी २०२४ रोजी तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पाच्या सर्व परवानग्यांना स्थगिती देण्याचे निर्देश दिले होते. विधान परिषदेतही त्यांनी गडचिरोली



जिल्ह्यात असा कोणताही मद्य प्रकल्प उभा राहणार नाही, अशी स्पष्ट ग्वाही दिली होती. सरकारच्या या अधिकृत आश्वासनानंतरही आता प्रदूषण नियंत्रण मंडळाने जनसुनावणीचा घाट घातल्याने जिल्हा दारूबंदी संघटनेने संताप व्यक्त केला आहे. 'ज्या प्रकल्पाला पालकमंत्र्यांनीच स्थगिती दिली, त्याची जनसुनावणी कशी काय होऊ शकते, असा सवाल डॉ. बंग यांनी उपस्थित केला आहे.गडचिरोली जिल्ह्यात १९९३ पासून कायदेशीर दारूबंदी लागू आहे.जिल्ह्यातील ११०० गावांमध्ये दारूबंदी संघटना सक्रिय असून, सुमारे ५० टक्के गावांनी अवैध दारूविक्री पूर्णपणे बंद करण्यात यश मिळवले आहे. अशा सामाजिक परिस्थितीत मद्यनिर्मितीचा कारखाना सुरू झाल्यास जिल्ह्याच्या दारूबंदी चळवळीला मोठा धक्का बसेल, अशी भीती व्यक्त होत आहे. २०१६ पासून जिल्ह्यात 'मुक्तीपथ' हा पथदर्शी प्रकल्प राबविला जात असून, लोकांची मानसिकता दारूमुक्तीकडे वळत असताना शासन स्तरावरून असे विरोधाभासी निर्णय घेतले जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. या प्रकल्पाविरोधात जिल्ह्यातील लोकभावना अत्यंत तीव्र आहेत. डिसेंबर २०२३ ते जानेवारी २०२४ या काळात जिल्ह्याभरात व्यापक स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली होती. त्यामध्ये १११४ गावे, ६३ महाविद्यालये आणि १४ आदिवासी इलाखा सभांमधील ८५ हजारांहून अधिक नागरिकांनी या कारखान्याविरोधात आपले मत नोंदवले होते. इतक्या मोठ्या प्रमाणावर लोकसंख्येचा विरोध असताना आणि खुद्द सरकारने स्थगिती दिलेली असतानाही प्रशासन या प्रकल्पासाठी पुढाकार घेत असल्याने संभ्रम निर्माण झाला आहे. जनतेचे हित दारूमुक्तीतच असून कारखानदारीच्या नावाखाली जिल्ह्याचे सामाजिक आरोग्य धोक्यात आणू नये, असा इशाराही संघटनेने पत्राद्वारे दिला आहे.

## गडचिरोली जिल्ह्यातील ५ प्रकरणे 'ऑन द स्पॉट' निकाली

### आमदार सुधाकर अडबाले यांच्या नेतृत्वाखाली सहविचार सभा

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी :**
**प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज : गडचिरोली जिल्ह्यातील खासगी अनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांतील कार्यरत शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या समस्या निवारणार्थ सभा दि. १७/०२/२०२६ ला आमदार श्री. सुधाकर अडबाले यांच्या प्रमुख उपस्थितीत मा. शिक्षणाधिकारी (माध्य.) यांच्या दालनात पार पडली.

सदर सभेमध्ये सुरवातीला मागील सभेच्या इतिवृतामधील विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. अनेक प्रलंबित प्रकरणे "ऑन द स्पॉट" निकाली काढण्यात आली.

जिल्हा परिषद गडचिरोली अंतर्गत शिक्षण विभाग अधिनस्त लेखाधिकारी यांच्या कार्यालयाच्या अनेक तक्रारी येत असल्याने या सर्व बाबींची शहानिशा



करून सदर आस्थापनेची तात्काळ चौकशी ही सुरू करण्यात यावी आणि केलेल्या कार्यवाहीबाबतची नोंद हि इतिवृतामध्ये घेण्यात यावी, अशा सूचना यावेळी आमदार श्री. सुधाकर अडबाले यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

कार्यालयातील प्रलंबित अनुकंपा तत्वावरील नियुक्ती प्रकरणे, शालार्थ आयडी प्रकरण, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक पदाच्या प्रलंबित मान्यता, वरिष्ठ/निवड श्रेणी प्रकरणे, प्रलंबित वैद्यकीय देयके, शिक्षक सेवक पदाची मान्यता, थकीत देयके, प्रलंबित पेन्शन केस, शाळांना वेतनेतर अनुदान वितरीत करण्याबाबतची सद्यःस्थिती, समायोजित शिक्षकांचे थकीत देयकाची सद्यःस्थिती, मंडळ मान्यता खाते मंजुरी प्रकरणे, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची थकबाकी देयक अशा अनेक सामूहिक व वैयक्तिक विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली व सदर प्रकरणे वेळेमध्ये निकाली काढण्याच्या सूचना यावेळी शिक्षणाधिकारी (माध्य.) तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

श्री. राजेश सातपुते श्री साईनाथ विद्यालय, मक्केपल्ली (ता. चामोर्शी) यांचे वरिष्ठ श्रेणी प्रकरण, श्री. नागेश्वर गेडाम (शिवाजी हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय, कुरखेडा, ता. कुरखेडा) आणि श्री. प्रकाश मठे विवेकानंद विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, मानापूर देलनवाडी ता. (आरमोरी) यांचे निवड श्रेणी प्रकरणे, श्री. पी. डी. दुधे (सहा. शिक्षक) भगवंतराव हायस्कुल, नरसिंहापल्ली (ता. सिरोंचा) यांना आर्थिक व प्रशासकीय अधिकार प्रदान करण्याचे अधिकार तसेच श्री. धनेंद्र चौधरी (पर्यवेक्षक, शिवाजी हायस्कुल तथा कनिष्ठ महाविद्यालय, गडचिरोली) यांच्या उपमुख्याध्यापक पदावर पदोन्नतीने मान्यता पुढील आदेशापर्यंत मान्यता असे एकूण सभेमध्ये ऑन द स्पॉट ५ प्रकरणे निकाली काढण्यात आले तसेच उर्वरित प्रकरणे २६ फेब्रुवारी २०२६ पर्यंत निकाली काढण्याच्या सूचना यादरम्यान आमदार अडबाले यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

यāप्रसंगी शिक्षणाधिकारी (माध्य.) श्री. वासुदेव भुसे, वेतन पथक अधिक्षक (माध्य.) श्री. विवेक नाकाडे , उपशिक्षणाधिकारी श्री. अमर गेडाम, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळ सदस्य श्री. दिलीप गडपल्लीवार, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष श्री. रवींद्र नैताम, जिल्हा कार्यवाह श्री. अजय लोंढे, कार्याध्यक्ष श्री. नरेंद्र भोयर, विजुक्टाचे जिल्हाध्यक्ष श्री. विजय कुत्तरमारे, श्री संजय घोटेकर, श्री. बापू मुनघाटे, श्री. मनोज निंबार्ते, श्री. किशोर पाचभाई, श्री. संजय कुनघाडकर, अजय वर्धलवार, संदीप अर्जुनकर, अरविंद भैसारे, यशवंत रायपुरे, संजय खांडरे, सतीश धाईत, राजू म्हस्के,जगदीश खरवडे, शरद गायकवाड, श्री. सोरते सर, संघटनेचे पदाधिकारी तसेच समस्याग्रस्त शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.




## पाहिजेत

'दैनिक विदर्भ केसरी' या अग्रगण्य मराठी वृत्तपत्राचा विस्तार संपूर्ण विदर्भात होत आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्हाला विदर्भातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर उत्साही, कल्पक आणि अनुभवी 'बातमीदार/प्रतिनिधी' नियुक्त करणे आहे.




### खा… …आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक ता… …की १ प्रतिनिधीची नियुक्त करणे आहे

**न…**
जि…
- नागपूर शहर,
- काटोल, नरखेड,
- सावनेर, रामटेक,
- हिंगणा, उमरेड इ.


**…मरावती**
…जिल्हा प्रतिनिधी
- अमरावती शहर, अंजनगाव सुर्जी,
- चांदूर बाजार, मोर्शी
- धामणगाव रेल्वे, चांदुर रेल्वे,
- मोर्शी, तिवसा, वरुड, इतर

**अकोला**
जिल्हा प्रतिनिधी
- अकोला शहर, अकोट,
- बाळापूर, पातूर,
- तेल्हारा, इ.

**यवतमाळ**
जिल्हा प्रतिनिधी
- यवतमाळ शहर दिग्रस,
- दारव्हा,वणी,
- पांढरकवडा, आर्णी इ.

**बुलढाणा**
जिल्हा प्रतिनिधी
- बुलढाणा, चिखली,
- खामगाव, शेगाव,
- मलकापूर, देऊळगाव
- राजा इ.

**चंद्रपूर**
- चंद्रपूर शहर,
- बल्लारपूर,
- वरोरा, भद्रावती,
- राजुरा, ब्रह्मपुरी



**आकर्षक वेतन**

संगणक चालक पेज डिझायनर.
- कोरल
- फोटोशॉप
- इनडिझाईन
- क्वॉर्क
- ज्ञान आवश्यक

- वर्धा जिल्हा वर्धा शहर, हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू, कारंजा इ.
- गोंदिया गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, आमगाव इ.
- भंडारा भंडारा, तुमसर, पवनी, साकोली, लाखांदूर इ.
- गडचिरोली जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली, अहेरी, चामोर्शी, देसाईगंज (वडसा), एटापल्ली इ.
- वाशिम शहर कारंजा लाड, रिसोड, मालेगाव, मानोरा,

वरील तालुका जिल्हा प्रतिनिधीसाठी इच्छुक असणाऱ्यानी आपला बायोडाटा (Biodata) आणि आधार कार्डची प्रत खालील व्हॉट्सअॅप नंबरवर पाठवावी किंवा संपर्क साधावा.

**कुणाल गायकवाड (जिल्हा प्रतिनिधी) मो.9579367474**
**अमोल कंटाळे (संपादक ) मो 9975532291**